**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 850 नाग/2010 व अपील क्रमांक 851 नाग/2010**

श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर
रामनगर वार्ड नं. 20 पोटेगाव रोड
गडचिरोली ता. जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एम. पुराम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री के. बी. गुंफावार
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
3) प्रथम अपीलीय अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद गडचिरोली
4) श्री अरविंद बहादुरसिंग चौहान (शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली)
रामपूरी वार्ड, कॅम्प एरीया, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
5) श्री एन. डी. मेश्राम सहा. लेखा अधिकारी
पंचायत समिती गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.6.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील क्रमांक 850 नाग/2010 व अपील क्रमांक 851 नाग/2010 अशी दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी घेवून राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांनी निर्णय दिलेला होता. तथापी सदरच्या निर्णया विरुध्द श्री अरविंद बहादुरसिंग चौहान (शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली) यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. 4722/2010 दाखल केलेली होती. प्रस्तूत याचिकेची मा. उच्च न्यायालयात सुनावणी झाली व सुनावणी होवून मा. उच्च न्यायालयाने दि. 2.2.2011 च्या

आदेशान्वये राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडील दि. 15.7.2010 चा निर्णय रद्यबातल करुन प्रस्तूत प्रकरणी राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांनी या अपीांची पुन्हा सुनावणी घेवून याचिकाकर्ता व श्री एन. डी. मेश्राम यांचे म्हणणे एकून घेवून निर्णय देण्याचे आदेश दिलेले आहेत.

2. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या उपरोक्त आदेशाला अनुसरुन अपीलकर्ता व उत्तरवादी आणि याचिकाकर्ता श्री अरविंद बहादुरसिंग चौहान आणि श्री एन. डी. मेश्राम यांचे म्हणणे मांडण्यासाठी दि. 20.4.2011 रोजी आयोगाचे नागपूर कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी याचिकाकर्ते श्री अरविंद बहादुरसिंग चौहान यांच्या वतीने ॲड. एन. डी. ठोंबरे हे उपस्थित होते. तसेच श्री एन. डी. मेश्राम सहा. लेखा अधिकारी पंचायत समिती गडचिरोली हे देखील उपस्थित होते.

3. **<u>अपील क्रमांक 850 नाग / 2010</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे गौण खनिजांची रॉयल्टी बाबत सन 2006–2007 व सन 2007–2008 जिल्हाधिकारी गडचिरोली करीता 130 / 10 / खनिकर्म विभाग / गडचिरोलीचे पत्रानुसार क्र. 1188 / गौण खनिजांची रक्कम रु. 54715 / – चा भरणा केल्याचा डी.डी.क्रमांक व दिनांक इत्यादी बाबतच्या सत्यप्रती मागितलेल्या होत्या. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 1.6.2010 व दि. 28.6.2010 रोजी दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

4. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे आयोगापुढे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्या उपरोक्त पत्राप्रमाणे कार्यवाही झाली किंवा नाही ही माहिती त्यांनी विचारली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर सदरची माहिती लेखा विभाग व बांधकाम विभागाशी संबंधीत असल्याने सदर माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री ए.बी. चौहान शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली व श्री एन. डी. मेश्राम सहा. लेखा अधिकारी व श्री ब्राम्हणवाडे सहा. आरेखक पंचायत समिती गडचिरोली यांना दि. 3.4.2010, दि. 15.4.2010, दि. 21.4.2010 व दि. 26.4.2010 च्या पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले होते. त्यावर श्री ब्राम्हणवाडे सहा. आरेखक यांनी त्यांचे पत्र दि. 15.4.2010 अन्वये गौण खनिजांची भरणा केलेल्या रक्कमे बाबत संबंधीत शाखा अभियंता यांचेकडे संपूर्ण दस्तऐवज असल्यामुळे त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले मात्र श्री ए.बी. चौहान शाखा अभियंता व श्री एन. डी. मेश्राम सहा. लेखा अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारचे पत्र किंवा माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे संबंधीतास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 1.6.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. मात्र त्यांनी सुनावणी घेतलेली नाही व श्री ए.बी. चौहान व श्री एन. डी. मेश्राम यांना सुनावणीच्या तारखेस उपस्थित राहावे असे कळविण्यात आले. त्यानंतर पुन्हा दि. 28.6.2010 रोजी निर्णय देवून सहा. लेखाधिकारी यांचे पत्र दि. 17.6.2010 अन्वये माहिती बाबत दस्तऐवजा वरुन तपासणी केली असता सदर माहिती लेखा विभागात उपलब्ध नाही असे कळविले. तसेच श्री ए.बी. चौहान हे उपस्थित होते व त्यांच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे आदेश पारीत केला नाही.

5. आजच्या सुनावणीस श्री ए.बी.चौहान यांच्या वतीने ॲड. एन. डी. ठोंबरे यांनी आयोगाकडे लेखी निवेदन सादर करुन आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही लेखा विभागाशी संबंधीत होती. त्यामुळे त्यांचेकडे ही माहिती नाही असे त्यांनी कळविले होते. मात्र अपीलकर्ता हे त्यांना मानसिक त्रास देत असून त्यांच्याशी संबंधीत नसलेली माहिती ते मागत असतात त्यांचे विरुध्द अपीलकर्ता हा नेहमी खोटया तक्रारी दाखल करीत असतात. म्हणून त्यांनी अपीलकर्ता यांचे विरुध्द फौजदारी कार्यवाही दाखल केलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही लेखा विभागाशी संबंधीत असल्याने त्या माहितीशी शाखा अभियंता श्री चौहान यांचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यास ते जबाबदार नाही म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करु नये असे ॲड. एन. डी. ठोंबरे यांनी सुनावणीत सांगितले.

6. आजच्या सुनावणीस श्री एन. डी. मेश्राम सहा. लेखा अधिकारी हे देखील उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने गौण खनिजांची रक्कम रु. 54715/- जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्याबाबत डी.डी.क्रमांक व त्याचा दिनांक ही माहिती मागितलेली होती. परंतू त्यासंबंधातील चौकशी अहवालाची प्रत त्यांना प्राप्त झाली नव्हती त्यामुळे चौकशी अहवालातील मुद्या क्र. 11 (8) मध्ये रु. 54715/- या रकमेचा उल्लेख दर्शविलेली होता त्याची खात्री त्यांना करता आली नाही. म्हणून त्यांनी याबाबतची खात्री करण्यासाठी जिल्हा परिषद गडचिरोली यांचे कार्यालयाकडून चौकशी अहवालाची प्रत प्राप्त करुन त्यामध्ये मुद्या क्र. 11 (8) मध्ये रु. 54715/- या रकमेचा उल्लेख दिसून आला. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दस्तऐवजाची तपासणी केली असता त्यांच्या लेखा विभागकडून रु. 54715/- चा डी.डी. काढण्यात आल्याचे दिसून आले नाही म्हणून सदर माहिती लेखा विभागात उपलब्ध नाही असे दि. त्यांनी 17.6.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांना दि. 22.6.2010 रोजी लेखी दिले. सदरची माहिती उपलब्ध नाही याची खात्री करुन घेण्यासाठी चौकशी अहवाल त्यांना उशिरा प्राप्त झाला म्हणून त्यांनी 17.6.2010 च्या पत्राने लेखा विभागात माहिती उपलब्ध नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांना कळविले.

7. अपीलकर्ता तसेच श्री चौहान यांचे ॲड. एन. डी. ठोंबरे व श्री एन. डी. मेश्राम यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही डी.डी. च्या संबंधात होती. त्यामुळे सदरची माहिती लेखा विभागाशी संबंधीत असल्याचे दिसून येते. तथापी श्री एन. डी. मेश्राम सहा. लेखाधिकारी यांना रु. 54715/— च्या डी.डी. बाबत खात्री करण्यासाठी वर नमुद केल्याप्रमाणे चौकशी अहवाल प्राप्त करण्यासाठी कालावधी लागलेला दिसून येतो. तथापी आता लेखा विभागातून रु. 54715/— चा डी.डी. काढलेला नाही असे दिसते. म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी गौण खनिजांची रक्कम रु. 54715/— चा डी.डी. लेखा विभागातून काढलेला नाही असे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

8. <u>**अपील क्रमांक 851 नाग/2010**</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांचेकडे 12 व्या वित्त आयोगाची पंचायत समिती स्तरावरील सन 2006—2007 व सन 2008 कामावरील मजुरांचे हजेरीपट बाबत श्री अरविंद बहादुरसिंग चौहान शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली यांनी कार्यारंभ आदेश 27,1990 40,778 1150,728 अन्वये सन 2006—2007 व सन 2007—2008 पर्यंत 12 व्या वित्त आयोगा अंतर्गत पंचायत समिती स्तरावर पूर्ण केलेल्या कामावरील मजुरांच्या हजेरीपटाची सत्यप्रत स्वतः उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक 3.5.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 28.6.2010 रोजी दिलेला आहे. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

9. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 29.3.2010 च्या अर्जान्वये मागितलेली माहिती ही श्री ए.बी. चौहान शाखा अभियंता पंचायत समिती गडचिरोली यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांना दि. 3.4.2010, दि. 15.4.2010, दि. 21.4.2010 व दि. 26.4.2010 रोजी ही पत्रे दिली व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले. परंतू त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी दि. 1.6.2010 रोजी ठेवण्यात आली परंतू जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी श्री ए.बी. चौहान यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की श्री ए.बी. चौहान यांनी त्यानंतर दि.7.7.2010 च्या पत्राने कळविले की त्यांचेकडील संपूर्ण रेकॉर्डच्या पाहनीअंती अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याने सदर माहिती ते पुरविण्यास असमर्थ आहेत व सदरील माहिती ही त्यांच्या टेबलाशी संबंधीत नाही असे कळविले आहे.

10. आजच्या सुनावणीस श्री ए.बी.चौहान यांच्या वतीने ॲड. एन. डी. ठोंबरे यांनी आयोगाकडे लेखी निवेदन सादर करुन आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही श्री ए.बी.चौहान यांच्याकडील रेकॉर्डची पाहणी केल्यानंतर असे दिसून आले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती श्री ए.बी.चौहान यांचेकडे उपलब्ध नव्हती. त्यामुळे ती माहिती देण्यास ते असमर्थ आहेत असे त्यांनी दि.7.7.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांना लेखी दिलेले आहे. तसेच अपीलकर्ता हे श्री ए.बी.चौहान यांचे विरुध्द माहितीच्या अधिकारा खाली वारंवार माहिती मागत असतात व ते श्री चौहान यांचा मानसीक छळ देखील करीत असतात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती श्री चौहान यांचेकडे उपलब्ध नाही असे त्यांनी दि.7.7.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविलेले आहे. त्यामुळे ते अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास असमर्थ आहेत हे देखील त्यांनी कळविलेले आहे. म्हणून श्री चौहान याबाबत जबाबदार नाहीत असे ॲड. एन. डी. ठोंबरे यांनी सुनावणीत नमुद केले.

11. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी आणि ॲड. एन. डी. ठोंबरे यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की श्री चौहान यांनी त्यांचेकडे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध नाही आणि त्यांच्या टेबलाशी निगडीत नाही हे दि.7.7.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविलेले आहे. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी दि. 3.4.2010, दि. 15.4.2010, दि. 21.4.2010 व दि. 26.4.2010 च्या पत्राने माहिती देण्यासाठी कळविले होते. मात्र या पत्राना श्री चौहान यांनी दि.7.7.2010 च्या पत्राने त्यांचेकडे माहिती उपलब्ध नसल्याचे विलंबाने कळविलेले दिसून येते. विलंबाबद्यल ॲड. ठोंबरे यांनी असा खुलासा केला की श्री चव्हाण यांना त्यांचे कडील संपूर्ण रेकॉर्डची पाहाणी करण्यासाठी कालावधी लागला आहे.

12. अपीलकर्ता, ॲड. ठोंबरे तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास तसे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडे होती याचा शोध घेवून त्यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) **<u>अपील क्रमांक 850 नाग/2010 मध्ये</u>** अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी गौण खनिजांची रक्कम रु. 54715/– चा डी.डी. लेखा

विभागातून काढलेला नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने विनामुल्य कळवावे.

2) **अपील कमांक 851 नाग/2010 मध्ये** अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना स्पष्टपणे कळवावे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती कोणत्या अधिकारी व कर्मचारी यांचेकडे होती याचा कसून शोध घेवून त्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि या बाबत जबाबदार असणा—या कर्मचा—यास माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) नुसार जन माहिती अधिकारी समजण्यात येत असून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांनी करावयाची आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1598-1603

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 24 नाग/2011**

श्रीमती पुष्पा डी. सूद
C/o. सूदविजन, 410/4, 1ला मजला, लुंबिनी नगर
मेकोसाबागजवळ नागपूर
ता. जि. नागपूर –440004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक (वै.)
शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पीटल इमारत,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर,
सी.एस.टी.मुंबई 400001
2) जन माहिती अधिकारी
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
शासकीय दंत महाविद्यालय व हॉस्पीटल इमारत,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर,
सी.एस.टी.मुंबई 400001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्त्या हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचेकडे माहिती मागितलेली होती. या माहिती मध्ये भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना अधिव्याख्याता भौतिकोपचार शास्त्र व अधिव्याख्याता व्यवसायोपचार शास्त्र पदाच्या दिलेल्या वेतनश्रेणीबाबत माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 11.10.10 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सदरच्या माहितीमध्ये सदरची वेतनश्रेणी कोणत्या कारणाने दिलेली आहे त्याची माहिती दिलेली नाही व दिलेली

माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस त्यांना उशिरा प्राप्त झाल्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकले नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 15.11.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेल्या माहिती मध्ये ज्या नोटीफिकेशनची प्रत दिलेली आहे त्या नोटीफिकेशनवर कोणतीही तारीख नाही. तसेच भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना अधिव्याख्याता भौतिकोपचार शास्त्र व अधिव्याख्याता व्यवसायोपचार शास्त्र पदाची दिलेली वेतनश्रेणी कोणत्या कारणाने दिलेली आहे किंवा कशाच्या आधारावर दिलेली आहे याची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. म्हणून त्यांना माहिती अर्जाप्रमाणे माहिती मिळावी अशी मागणी त्यांनी आयोगा समोर केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांच्या वतीने श्री जी.व्ही.आवटे हे उपस्थित होते. तसेच संचालनालया तर्फे डॉ. पी.जी.दिक्षीत हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 9.8.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.8.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 11.10.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी ज्या आधारावर वेतनश्रेणी दिलेली आहे त्याची माहिती दिलेली नाही. तसेच बिनातारखेचे नोटीफिकेशन दिलेले आहे ते नोटीफिकेशन त्यांच्याशी संबंधीत नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ती तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना अधिव्याख्याता भौतिकोपचार शास्त्र व अधिव्याख्याता व्यवसायोपचार शास्त्र पदाची दिलेली वेतनश्रेणी कोणत्या कारणाने दिलेली आहे किंवा कशाच्या आधारावर दिलेली आहे याची माहिती मागितलेली दिसून येते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी दिलेली वेतनश्रेणी कोणत्या आधारावर किंवा कोणत्या कारणाने दिलेली आहे याची माहिती दि. 11.10.2010 च्या पत्राने दिलेली दिसून येत नाही. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. तसेच अपीलकर्त्यास पाठविलेल्या नोटीफिकेशनच्या प्रती वर नोटीफिकेशनची तारीख नाही म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना अधिव्याख्याता भौतिकोपचार शास्त्र व अधिव्याख्याता व्यवसायोपचार शास्त्र पदाची दिलेली वेतनश्रेणी कोणत्या कारणाने दिलेली आहे किंवा कशाच्या आधारावर दिलेली आहे याबाबतची सुधारीत माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच ज्या नोटीफिकेशनची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे त्या नोटीफिकेशन वर तारीख दिसून येत नाही. त्याबाबीची वस्तुस्थिती देखील अपीलकर्त्यास कळवावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1614-1616

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 25 नाग/2011**

श्रीमती पुष्पा डी. सूद
C/o. सूदविजन, 410/4, 1ला मजला, लुंबिनी नगर
मेकोसाबागजवळ नागपूर
ता. जि. नागपूर –440004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डोंगरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर
सेंट्रल एव्हेन्यू रोड नागपूर 18

2) श्री मडावी
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर
सेंट्रल एव्हेन्यू रोड नागपूर 18 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्त्या हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना कालबध्द पदोन्नतीच्या योजने अंतर्गत देण्यात आलेली अधिव्याख्याता या पदाची वेतनश्रेणी कुठल्या आधारावर देण्यात आलेली आहे याबाबत 1 ते 5 मुद्यांची माहिती

मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 22.10.10 च्या पत्राने माहिती प्राप्त झालेली आहे. सदरची माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी श्री मडावी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन दि. 22.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास 1 ते 5 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्या माहिती बाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ पदाची वेतनश्रेणी कुठल्या आधारावर देण्यात आलेली आहे याची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भात काढलेला निष्कर्ष देखील चुकीचा आहे म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना मान्य नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारा खाली माहिती पुरविलेली असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

5. अपीलकर्ती तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास प्रामुख्याने भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना अधिव्याख्याता या पदाची वेतनश्रेणी कुठल्या आधारावर देण्यात आलेली आहे याची माहिती त्यांना पाहिजे होती. परंतू जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.10.2010 च्या पत्राने त्यांना पुरविलेल्या माहिती मध्ये ही माहिती दिलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास सदरची वेतनश्रेणी कुठल्या आधारावर देण्यात आलेली आहे याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी भौतिकोपचार तज्ञ व व्यवसायोपचार तज्ञ यांना अधिव्याख्याता या पदाची वेतनश्रेणी कुठल्या आधारावर देण्यात आलेली आहे त्याची वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1618-1620

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 26 नाग/2011

श्रीमती पुष्पा डी. सूद
C/o. सूदविजन, 410/4, 1ला मजला, लुंबिनी नगर
मेकोसाबागजवळ नागपूर
ता. जि. नागपूर –440004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डोंगरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर
सेंट्रल एव्हेन्यू रोड नागपूर 18

2) श्री मडावी
जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर
सेंट्रल एव्हेन्यू रोड नागपूर 18 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्त्या हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्याकडील तक्रार अर्ज दि. 9.3.2010, दि. 18.3.2010, दि. 28.3.2010, दि. 30.5.2010, दि. 15.6.2010, दि. 16.8.2010 या दिलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही केली याबाबतची माहिती मागितलेली होती. परंतू त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी अधिष्ठाता यांचेकडे दि. 25.10.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नामंजूर केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर श्री मडावी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता हे देखील उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 27.8.2010 च्या अर्जा संदर्भात केलेल्या कार्यवाही बाबत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे सर्व तक्रार अर्ज ज्या ज्या प्राधिकरणाशी संबंधीत आहे त्या त्या प्राधिकरणाला कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे. म्हणून अपीलकर्त्याचे तक्रार अर्ज ज्या ज्या प्राधिकरणाला पाठविलेले आहेत त्याच्या प्रती अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल.

5. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 27.8.2010 च्या अर्जाला अनुसरुन कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून प्रस्तूत प्रकरणात जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला असून सदरच्या विलंबास जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. या विलंबाद्यल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास यापूर्वी वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरचा खुलासा मान्य करण्यासारखा दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्तीचे अपील हे मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे तक्रार अर्ज ज्या ज्या प्राधिकरणाला पाठविलेले असतील त्या पत्राच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्यात.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 27.8.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. त्या विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. या विलंबाद्यल जन

माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे केलेला खुलासा योग्य व समर्थनीय दिसून येत नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 2000/– ची शास्ती लादण्यात येत आहे.

3) सदरच्या शास्तीची वसुली अधिष्ठाता इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांनी त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1622-1624

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 27 नाग/2011**

श्रीमती पुष्पा डी. सूद
C/o. सूदविजन, 410/4, 1ला मजला, लुंबिनी नगर
मेकोसाबागजवळ नागपूर
ता. जि. नागपूर –440004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय मुंबई 32

2) श्रीमती वर्षा डोंगरे
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्त्या हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 16.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांचे तक्रार अर्ज दि. 9.3.2010, दि. 18.3.2010, दि. 28.3. 2010, दि. 30.5.2010, दि. 15.6.2010, इत्यादी तारखांना दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. सदर तक्रार अर्जामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यामध्ये होत असलेल्या गैरव्यवहारा बाबत तक्रारी केलेल्या

होत्या. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त नाही. मात्र विलंबाने म्हणजे दि. 18.10.10 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांना असे कळविले की आपले सर्व अर्ज योग्य कार्यवाहीस्तव संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांना 14 ऑक्टोबर 2010 च्या पत्राने पाठविलेले आहेत. मात्र सदरचे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या मुदतीत दिलेले नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 अन्वये कार्यवाही करावी तसेच त्यांच्या तक्रार अर्जात ज्या कार्यालया विषयी तक्रारी आहेत त्याच कार्यालयाकडे ते तक्रार अर्ज कार्यवाहीसाठी पाठविणे हे अत्यंत चुकीचे आहे असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत नमुद करुन असेही सांगितले की त्यांच्या तक्रार अर्जावर केलेलया कार्यवाहीची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांचेकडूनच माहिती मिळणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य नाही तसेच ज्या अधिका–या विषयी तक्रारी आहेत त्यांच्याकडेच चौकशीसाठी व कार्यवाहीसाठी ते अर्ज पाठविणे हे अत्यंत चुकीचे आहे म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचा प्रथम अपीलातील निर्णय हा अत्यंत चुकीचा असून त्यांना मान्य नाही असेही अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई श्रीमती वर्षा डोंगरे हया उपस्थित होत्या. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 16.8.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.8.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने त्यांच्या वरीष्ठांबाबत तक्रारी केलेल्या होत्या. त्यां तक्रारीवर केलेलया कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तसेच त्यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी अपीलकर्त्याचे सर्व मुळ अर्ज संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे 14 ऑक्टोबर 2010 च्या पत्राने पाठविलेले होते आणि दि. 18.10.10 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की दिलेले सर्व अर्ज योग्य त्या कार्यवाहीस्तव संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे. म्हणून दि. 18.10.10 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याबद्यल जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की त्या दि. 20.8.2010 ते दि. 26.9.2010 या कालावधीत रजेवर असल्याने माहिती देण्यास विलंब झालेला आहे. कारण अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दि. 27.8.2010 रोजी प्राप्त झालेला असून त्याचे उत्तर दि. 18.10.10 रोजी अपीलकर्त्यास

पाठविलेले आहे. म्हणून 30 दिवसात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे खुलासा केला. वास्तविक पाहता अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 27.8.2010 रोजी प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. विद्यमान जन माहिती अधिकारी हया दि. 20.8.2010 ते दि. 26.9.2010 या कालावधीत रजेवर असतांना त्यांचा पदभार ज्या अधिका–याकडे होता त्यांनी सदरची माहिती अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे दक्षता घेवून 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात.

4. तसेच जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी अपीलकर्त्याचे तक्रार अर्ज 14 ऑक्टोबर 2010 च्या पत्राने संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे पाठविल्यानंतर त्यावर काय कार्यवाही केलेली आहे याबाबतची माहिती अपीलकर्तीस माहिती अधिकाराखालील अर्जाला अनुसरुन कळविणे देखील आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई त्यांनी अपीलकर्तीच्या तक्रार अर्जावर केलेलया कार्यवाहीची माहिती त्यांच्याकडील दि. 16.8.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई यांनी अपीलकर्तीस वर नमुद केल्याप्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून या विलंबास जबाबदार असणा–या जन माहिती अधिकारी यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 नुसार शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे

सादर करावा. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या रजेच्या कालावधीत त्यांचा पदभार ज्या अधिका–याकडे सोपविण्यात आला होता त्यांच्याकडे या विलंबाच्या खुलाशासाठी या निर्णयाची प्रत पाठवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1626-1629

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1744 नाग/2011**

श्रीमती पुष्पा डी. सूद
C/o. सूदविजन, 410/4, 1ला मजला, लुंबिनी नगर
मेकोसाबागजवळ नागपूर
ता. जि. नागपूर –440004 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डोंगरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (वैवेसा–4)
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय मुंबई 32

2) श्रीमती वर्षा डोंगरे
जन माहिती अधिकारी तथा अवरसचिव (वैवेसा–4)
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढून दि. 30.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्त्या हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांचे तक्रार अर्ज दि. 9.12.2009, दि. 27.6.2010, दि. 11.7.2010, दि. 21.7.2010, इत्यादी तारखांना त्यांनी निवेदने दिलेली होती. त्या पत्रावर काय कार्यवाही केलेली आहे याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. मात्र त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र

त्यानंतर विलंबाने म्हणजे दि. 18.10.10 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांना असे कळविले की आपले सर्व अर्ज योग्य कार्यवाहीस्तव संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे पाठविलेले आहेत. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी उपसचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की वर्ग 3 च्या कमचा–यांची नियुक्ती अधिकारी संचालक वैद्यकीय शिक्षण हे आहेत. त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात संबंधीत महाविद्यालयाचे अधिष्ठाता सुध्दा योग्य तो निर्णय घेण्यास सक्षम आहेत या बाबी लक्षात घेवून जन माहिती अधिकारी तथा अवरसचिव यांनी त्यांचे अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संचालकाकडे पाठविलेले आहेत. म्हणून शासन स्तरावर त्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही असा निष्कर्ष काढून प्रथम अपील खारीज केलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयात काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय चुकीचा व दिशाभूल करणारा घेतलेला आहे असे अपीलकर्तीने आयोगा पुढे सुनावणीत सांगितले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले असून माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करावी असे अपीलकर्तीने आयोगा पुढे सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग मंत्रालय मुंबई श्रीमती वर्षा डोंगरे हया उपस्थित होत्या. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा माहिती मागण्याचा दि. 9.8.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.8.2010 रोजी प्राप्त झाला. आणि अपीलकर्तीस दि. 18.10.10 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्यामध्ये असे नमुद केले की आपले सर्व अर्ज योग्य कार्यवाहीकरीता संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे दि. 14.10.2010 च्या पत्राने पाठविलेले आहेत. अपीलकर्तीस सदरची माहिती दि. 18.10.10 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्तीस सदरची माहिती 30 दिवसाच्या मुदतीत उपलब्ध करुन देता आली नाही त्याबाबत त्यांनी असे नमुद केले की त्या दि. 20.8.2010 ते दि. 26.9.2010 या कालावधीत रजेवर असल्याने माहिती देण्यास विलंब झालेला आहे. वास्तविक पाहता विद्यमान जन माहिती अधिकारी हया दि. 20.8.2010 ते दि. 26.9.2010 या कालावधीत रजेवर असतांना त्यांचा पदभार ज्या अधिका–याकडे होता त्यांनी सदरची माहिती अपीलकर्तीस 30 दिवसाच्या मुदतीत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे दक्षता घेवून 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. मात्र सदरची माहिती दि. 18.10.10 च्या पत्राने अपीलकर्तीस विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे.

म्हणून या विलंबास रजेच्या कालावधीत ज्या अधिका–याकडे जन माहिती अधिकारी पदाचा पदभार होता ते जबाबदार दिसून येतात. तसेच अपीलकर्तीचे अर्ज संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले होते. त्याबाबत जन माहिती अधिकारी संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई श्री अवटे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचे अर्ज मंत्रालयातून त्यांचेकडे दि. 14.10.2010 च्या पत्राने प्राप्त झाले होते. अपीलकर्तीची मुख्य मागणी कालबध्द पदोन्नती देण्याबाबत आहे आणि कालबध्द पदोन्नती देण्याबतचे अधिकार हे अधिष्ठाता यांना आहेत. तसेच अपीलकर्तीची मुख्य मागणी अधीव्याख्याता पदाची वेतनश्रेणी मिळावी अशी आहे. परंतू सदरची बाब नियमात बसत नाही म्हणून त्यांना दि. 28.9.2010 च्या पत्राने अपीलकर्तीस कळविलेले आहे असे संचालनालयाचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र अपीलकर्तीस त्यांच्या कडील दि. 9.8.2010 च्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी अपीलकर्तीस त्यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांनी अपीलकर्तीस त्यांच्या दि. 9.8.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई यांनी अपीलकर्तीस दि. 18.10.10 च्या पत्राने पाठविलेले उत्तर 30 दिवसाच्या मुदतीत पाठविलेले नाही. सदरचे उत्तर विलंबाने पाठविलेले आहे. म्हणून सदरच्या विलंबास विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या रजेच्या कालावधीत त्यांच्या पदाचा पदभार ज्या अधिका–याकडे सोपविण्यात आला होता ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 नुसार शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या

आदेशाची प्रत खुलाशासाठी त्यांच्या रजेच्या कालावधीतील पदभार सांभाळणा–या जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1631-1634

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 32 नाग/2011**

श्री आनंदराव नरहरी बोंदाडे
अश्विन निवास, कॉलनी नं. 8 आर, चंद्रमणी नगर नागपूर
ता. जि. नागपूर –27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक
स्टेट ट्रान्सपोर्ट को–ऑपरोटिव्ह बॅक लि. मुंबई
महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल मुंबई 400008

2) श्री एम. जी. गोखले
जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक
स्टेट ट्रान्सपोर्ट को–ऑपरोटिव्ह बॅक लि.शाखा नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2011 )**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 8.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक स्टेट ट्रान्सपोर्ट को–ऑपरोटिव्ह बॅक लि.शाखा नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बॅकेच्या संचालक मंडळाच्या जानेवारी 2007 पासून ऑगस्ट 2010पर्यंत झालेल्या मासीक बैठकांबद्यल माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक यांनी दि. 8.9.2010 च्या पत्राने असे कळविले की त्यांच्या बॅकेला माहितीचा अधिकार लागू होत नाही त्यामुळे

त्यांनी नंतर प्रथम अपील व्यवस्थापकीय संचालक स्टेट ट्रान्सपोर्ट को–ऑपरोटिव्ह बॅक लि. मुंबई यांचेकडे दाखल केले. त्यांनी देखील दि. 28.10.2010 च्या पत्राने असे कळविले की सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था पूणे यांचेकडील दि. 8.2.2006 च्या आदेशा प्रमाणे ज्या सहकारी बॅकाना शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने देण्यात येत नाही त्यांना माहितीचा अधिकार कायदा लागू होत नाही असे त्यांना कळविण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक श्री एम. जी. गोखले हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 8.9.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. आणि त्याच दिवशी म्हणजे दि. 8.9.2010 रोजी अपीलकर्त्यास त्यांच्या बॅकेला माहितीचा अधिकार कायदा लागू होत नाही असे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या बॅकेला माहितीचा अधिकार कायदा लागू होत नाही असे अपीलकर्त्यास कळविलेले आहे.

4. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सुनावणीत असेही सांगितले की त्यांच्या बॅकेला शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्राप्त झालेले नाही. त्यामुळे त्यांना हा कायदा लागू होत नाही.

5. प्रस्तूत प्रकरणी असेही दिसून येते की मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडे याचिका क्र. 5666/2007 डॉ. पंजाबराव देशमूख नागरी सहकारी बॅक यांनी दाखल केलेली होती. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे की ज्या सहकारी बॅकांना शासनाचे कोणतेही वित्तीय सहाय्य मिळत नाही त्यांना माहितीच्या अधिकाराच्या तरतूदी लागू होत नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या या आदेशाला अनुसरुन माहितीच्या अधिकाराच्या तरतूदी सहकारी बॅकांना लागू होत नाही.

6. तथापी सदरची बॅक सहकार कायद्याखाली नोंदणी झालेली असल्यामुळे अपीलकर्त्याने सहकार कायद्यातील तरतुदीला अनुसरुन संबंधीत निबंधक सहकारी संस्था यांचेकडे या बॅकेची माहिती प्राप्त करुन घेण्या बाबतची कार्यवाही करणे योग्य होईल. म्हणून सहकारी बॅकांना माहितीच्या अधिकाराच्या तरतूदी लागू होत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1627-1629

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 33 नाग/2011

श्रीमती अलका रमेश इंगळे
प्लॉट नं. 54, पवनसुत नगर, रमना मारोती रोड
आखरी बस स्टॉप नागपूर
ता. जि. नागपूर –09 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) सौ. इंगाले
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
प्रकाश कृषी विद्यालय पारडी नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 14.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रकाश कृषी विद्यालय पारडी नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन प्रकाश कृषी विद्यालय पारडी नागपूर येथील शिक्षक श्रीमती भस्मे व श्रीमती बुजवणे हया दोन्ही शिक्षिका अतिरिक्त ठरविण्यात आले आहेत. परंतू त्या दोन्ही शिक्षिका आजपर्यंत विद्यालयात कार्यरत आहेत त्याबाबत माहिती मागितलेली होती. तसेच शाळेतील शिक्षक श्री रवी बोरकर यांच्या डी.एड. प्रशिक्षणाबाबतचे प्रमाणपत्र आणि त्यांना संस्थेने दिलेल्या पगार बीलाच्या प्रमाणीत प्रति मागितलेल्या होत्या. त्या अर्जाला अनुसरुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.10.10 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची

सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाचा निर्णय देवून त्यामध्ये असे नमुद केले की श्रीमती भस्मे व श्रीमती बुजवणे हया अतिरिक्त शिक्षिका कार्यरत आहेत त्याबाबतचा खुलासा शाळेने करावा तसेच रवी बोरकर यांच्या डी.एड. प्रशिक्षणाबाबतचे प्रमाणपत्र आणि डी.एड. करीता परवानगी दिल्याची प्रमाणीत प्रत आणि श्री रवी बोरकर यांच्या पगार बीलाची प्रत इत्यादींची माहिती अपीलकर्त्यास कळविण्याबाबतचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिले मात्र अद्यापही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. इंगोले हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. इंगोले यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 14.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 25.10. 2010 च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना श्री रवी बोरकर यांच्या डी.एड. प्रमाणपत्रची प्रत तसेच त्यांना देण्यात आलेल्या वेतनाची प्रत त्यांना डी.एड. प्रशिक्षणास परवानगी दिल्याची प्रत अद्यापही मिळाली नाही.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री पाटील यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. 30.10.2010 रोजी दाखल करण्यात आले होते. त्याची सुनावणी दि. 26.11.2010 रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 6.12. 2010 रोजी देण्यात आला. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात त्यांनी मुख्याध्यापक यांना अपीलकर्त्याने मागितलेली माहिती 10 दिवसात पुरविण्याचे आदेश दिलेले होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश मुख्याध्यापिका यांचेकडे प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीलाची सुनावणी असल्याचे कळल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयात जावून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 28.3.2011 रोजी प्राप्त केला. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्त्यास सुधारीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या दि. 6.12.2010 च्या आदेशाप्रमाणे सर्व माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून प्रथम अपीलाचा दिलेला निर्णय हा योग्य व संयुक्तिक असल्यामुळे त्यामध्ये हस्तक्षेप करण्याची आयोगाला आवश्यकता वाटत नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या दि. 6.12.2010 च्या आदेशाप्रमाणे आवश्यक ती माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1631-1633

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 34 नाग/2011

श्री रमेश दशरथ इंगळे
प्लॉट नं. 54 पवनसुत नगर रमना मारोती रोड
आखरी बस स्टॉप नागपूर
ता. जि. नागपूर – 09 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) सौ. इंगाले
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
प्रकाश कृषी विद्यालय पारडी नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 31.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रकाश कृषी विद्यालय पारडी नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री मनोहर चन्ने यांच्या मुळ सेवा पुस्तकाची पहिल्या पाना पासून ते शेवटच्या पानाच्या प्रती मागितलेल्या होत्या. तसेच श्री मनोहर चन्ने हे सद्या शाळेत किंवा संस्थेत कोणत्या पदावर कार्यरत आहेत त्याची माहिती मागितलेली होती. त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.10.10 च्या पत्राने त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये श्री चन्ने यांच्या सेवापुस्तकाची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 8 (जी) व नियम 8 (जे) अन्वये गोपनिय

असल्यामुळे देता येत नाही असे कळविले आणि श्री चन्ने हे संस्थेत सद्या ज्या पदावर कार्यरत आहेत त्याबाबतची माहिती त्यांना प्राप्त करुन दिलेली आहे. मात्र सेवापुस्तकाची प्रत प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही सेवापुस्तकाची प्रत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 6.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 25.10.10 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली असून त्यामध्ये श्री मनोहर चन्ने हे सद्या शाळेत ज्या पदावर कार्यरत आहेत त्याची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र श्री चन्ने यांचे सेवापुस्तक हे गोपनिय स्वरुपाचे दस्तऐवज असल्यामुळे ते उपलब्ध करुन देण्यात आले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले. मात्र त्यानंतर अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाला नाही मात्र सदरचा निर्णय शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात दि. 28.3.2011 रोजी जावून प्राप्त केला. त्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली. आणि निर्णय दि. 6.12.2010 रोजी देण्यात आला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास 7 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहेत.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने तत्कालीन मुख्याध्यापक श्री मनोहर चन्ने यांच्या सेवापुस्तकाची प्रत मागितलेली आहे. कार्यालयात त्यांच्या सेवापुस्तकाची प्रत उपलब्ध आहे. सदरच्या सेवापुस्तकाची प्रत ही कोणत्याही प्रकारे गोपनिय स्वरुपाचे दस्तऐवज नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (जी) व कलम 8 (जे) ची प्रत देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे समर्थनीय नाही. म्हणून अपीलकर्त्यास श्री मनोहर चन्ने यांच्या सेवापुस्तकाची प्रत उपलब्ध करुन देणे न्यायाचित होईल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास श्री मनोहर चन्ने हे सद्या शाळेत ज्या पदावर कार्यरत आहेत त्याची माहिती दि. 25.10.10 च्या पत्राने अपीलकर्त्यास पुरविलेली दिसते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना श्री मनोहर चन्ने तत्कालीन मुख्याध्यापक यांच्या सेवापुस्तकाची झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1627-1629

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 11 नाग/201

श्री बि. व्हि. बेताल
महिती व मार्गदर्शक कार्यालय, काजीवार्ड
ब्स स्टॅंड समोर हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष
रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि. 17.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी हे आजारी असल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. म्हणून पुढील सुनावणी दिनांक 31.3.2011 रोजी ठेवण्यात आली आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा या महाविद्यालयाच्या कामकाजाबाबत एकुण 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अध्यक्ष यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व तसा कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि 30 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांच्या वतीने लायब्रेरीयन श्री सुषांत मस्के हे उपस्थित होते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अध्यक्ष हे आजच्या सुनावणीस गैरहजर होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांच्या वतीने सुनावणीस उपस्थित असलेले श्री सुषांत म्हस्के यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 27.9.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 5.5.2010 रोजी माहितीचे शुल्क रु. 200/- आणि पोस्टाचा खर्च रु. 25/- असे रु. 225/-एकुण शुल्क भरण्याबाबतचे पत्र पाठविले होते मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती देता आली नाही. तथापी सदरचे माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे दि. 5.5.2010 चे पत्र पोस्टाने पाठविल्याबाबतच्या जावक रजिस्टरची सत्यप्रत पाहिली असता त्या रजिस्टर वर सदरचे पत्र कोणत्या जावक क्रमांकाने पाठविले आहे तो जावक क्रमांक नमुद नाही. म्हणून पोस्टाने शुल्क भरण्याबाबतचे पाठविलेले पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही. कारण सदरचे पत्र पोस्टाने पाठवितांना जावक रजिस्टरमध्ये जावक क्रमांक असणे आवश्यक आहे. मात्र या पत्रावर जावक रजिस्टर मधील नोंदवहीत जावक क्रमांक दिसून येत नाही. तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील अध्यक्ष यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही. केवळ अपीलकर्त्यास दि. 2.12.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले आहे की माहितीचे शुल्क भरले नसल्याने अर्ज रद्य समजण्यात येत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि. 2.12.2010 चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नसल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. सदरचे पत्र पोस्टाने पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या वतीने सुनावणीस उपस्थित असलेले श्री सुषांत म्हस्के यांनी सांगितले. तथापी जावक रजिस्टरची सत्यप्रत पाहिली असता असे दिसून येते की सदरच्या पत्राची जावक रजिस्टर मधे जावक क्रमांक 142 (2) अशी नोंद असून ती दि. 2.12.2010 रोजी केलेली दिसते. तसेच त्या जावक रजिस्टर मधील दि. 1.12.2010 मधील 141 जावक क्रमांकाचे पत्र समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना नागपूर यांना पाठविलेले दिसते. म्हणून अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्राला 142 (2) असा जावक क्रमांक कां देण्यात आला याचे कोणतेही समर्थन श्री म्हस्के सुनावणीत करु शकले नाही. यावरुन अपीलकर्त्यास शुल्क भरण्याबाबतचे पाठविलेले पत्र तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पाठविलेले पत्र ही दोन्ही पत्रे अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची खात्री सुनावणीत होवू शकली नाही.

5. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास आता जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यास विलंब झाल्याने सदरची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 27.9.2010 च्या माहिती अर्जातील मुद्या 1 ते 6 ची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1631-1633

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 45 नाग/2011

श्री सचिन सर्जेराव काचोरे
29 सुराबर्डी(तकीया) अमरावती रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अ. सु. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग–1
नागपूर ग्रामीण नागपूर
90 जुनघरे निवास शिवाजी नगर नागपूर

2) श्री एस. डी. घरडे
जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग–2
हिंगणा
पंचवटी पार्क हिंगणा ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग–2 हिंगणा ता. हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 6.10.1997 व दि. 12.11.1097 रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक 595 व दस्त नोंदणी क्र. 571 आणि अनुक्रमांक 735 व त्याचा नोंदणी क्र. 705 या स्थावर मलमत्तेचे विक्रीपत्राचे सत्यप्रतिलिपीची मागणी केलेली होती. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलानंतरही

त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी सुनावणीत असेही नमुद केले की त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. 12.7.2010 च्या माहिती अर्जा खालील अर्जाला अनुसरुन दि. 27.7.10 च्या पत्राने त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र सदरच्या माहितीमध्ये असे नमुद केले की त्यांनी मागितलेल्या दस्तऐवजाच्या प्रती सद्या त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. परंतू उपलब्ध करुन देण्यासाठी शोध घेण्यात येत आहे आणि सदरच्या प्रती मिळाल्या नंतर आपणास उपलब्ध करुन देण्यात येतील असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. मात्र अद्यापही त्यांना दस्तऐवजाच्या प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग–2 हिंगणा आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग–1 नागपूर ग्रामीण नागपूर हे उपस्थित होते.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 12.7.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याच्या माहितीचा शोध घेण्यात आला. परंतू त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन असे दिसून आले की दस्त क्रमांक 595/97 व दस्त क्र. 735/97 याबाबतचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे. मात्र दस्त क्र. 958 व 957 बाबतचा अर्ज प्राप्त नाही. दस्त क्रमांक 595/97 व दस्त क्र. 735/97 संदर्भातील कार्यालयीन प्रतीचे व्हॉल्यूम क्रमांक 55, 59 हे या कार्यालयाचे पत्र क्र. नासरे/दस्त तपासणी/329/2005 दि. 28.10.2005 च्या पत्रान्वये सह जिल्हा निबंधक वर्ग–1(निम्न श्रेणी) नागपूर ग्रामीण नागपूर यांचेकडे तपासणीकरीता पाठविण्यात आलेले आहे. ते अद्याप या कार्यालयात प्राप्त नाही. या बाबत त्यांच्या कार्यालयाने दि. 14.7.2010 अन्वये सह जिल्हा निबंधक वर्ग–1 नागपूर ग्रामीण नागपूर यांचेकडे व्हॉल्यूम क्रमांक 55, 58 व 59 ची मागणी केलेली आहे. सदरचे व्हॉल्यूम प्राप्त होताच आपणास उक्त दस्ताच्या प्रमाणित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील. अपीलकर्त्यास 30 दिवसाचे मुदतीत कळविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.
आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

6. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग–1 नागपूर ग्रामीण नागपूर श्री अ. सु. पाटील हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या दस्तऐवजाचा शोध त्यांच्या कार्यालयामध्ये घेण्यात आला. मात्र त्यांच्या कार्यालयात अद्यापही ते दस्तऐवज सापडलेले नाही. त्याचे कारण असेही आहे की त्यांच्या कार्यालयाचे सन 2003 मध्ये विभाजन झाले आणि त्यामध्ये कार्यालयाच्या रेकॉर्डचे स्थानांतरण झालेले आहे. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 14 वर्षा पूर्वीची असल्यामुळे हया रेकॉर्डचा शोध घेवूनही अद्याप ती माहिती उपलब्ध झालेली नाही. तथापी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध व्हावी या हेतूने प्रथम अपीलीय अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपीकांचे एक पथक तयार करुन सदरच्या माहितीचा शोध घेण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे सुनावणीत सांगितले. आणि त्या पथकाने शोध घेतल्यानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाल्यास त्वरीत विनामुल्य देण्यात येईल असेही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे सुनावणीत सांगितले.

7. प्रस्तूत सुनावणीच्या वेळी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागणी केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती ज्या व्यक्तीशी संबंधीत आहे त्या व्यक्तींना देखील पत्रव्यवहार करुन त्यांच्याकडून त्या दस्तऐवजाच्या प्रती मागविण्याची कार्यवाही करण्यात येईल आणि त्या संबंधीत व्यक्तींनी त्यांना हया प्रती दिल्यास सदरच्या प्रती सत्यप्रतीलिपी म्हणून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल आणि सदरच्या दस्तऐवजाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत अपीलकर्त्याने आयोगा पुढे संमती दिली. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा शोध घेण्यासाठी एक स्वतंत्र पथक तयार करण्यात यावे आणि त्यांच्याकडून माहितीचा शोध घेण्याची कार्यवाही करावी. दरम्यानच्या काळात संबंधीत दस्तऐवज ज्या व्यक्तींचे आहे त्या व्यक्तींना पत्रव्यवहार करुन त्याच्या सत्यप्रतीलिपी मागवाव्या आणि ती कागदपत्रे संबंधीत व्यक्तींकडून प्राप्त झाल्यावर अपीलकर्त्यास ती कागदपत्रे सत्यप्रतीलिपी म्हणून द्यावे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 महिन्याच्या मुदतीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा शोध घेण्यासाठी एक स्वतंत्र शोध पथक तयार करावे आणि त्यांच्याकडून माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती

पुरवावी. तसेच दरम्यानच्या काळात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संबंधीत व्यक्तींकडून दस्तऐवजाच्या प्रती मागण्यासाठी कार्यवाही करावी आणि त्या संबंधीत व्यक्तींकडून दस्तऐवजाच्या प्रती मिळाल्यास त्या अपीलकर्त्यास सत्यप्रतीलिपी म्हणून उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1635-1638

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 47 नाग/2011

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास अजय नगर
अंबाझरी हिल टॉप नागपूर
ता. जि. नागपूर – 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री सौ. कांबळे
जन माहिती अधिकारी तथा संचालक(सौ.आम्रपाली वैशिष्ट कांबळे)
स्वस्त धान्य दुकान शिरुळ
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संचालक(सौ. आम्रपाली वैशिष्ट कांबळे) स्वस्त धान्य दुकान शिरुळ ता. हिंगणा जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.1.2010 ते दि. 11.11.2010 या कालावधीत त्यांच्या स्वस्त धान्य दुकानातून ग्राहकांना पुरवठा करण्यात आलेल्या स्टॉकची माहिती मागितलेली होती. त्यांच्या ग्राहकाकडून धान्य वाटपापोटी वसूल केलेल्या पैशांच्या बिलांची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून स्वस्त धान्य दुकानातील संपूर्ण स्टॉकची माहिती उपलब्ध झाली. मात्र ग्राहकाकडून पैसे वसूली संदर्भात केलेल्या बीलाच्या झेरॉक्स प्रती मिळाल्या नाहीत.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्यास यापूर्वीच स्वस्त धान्य दुकानातील स्टॉकची माहिती पुरविण्यात आलेली आहे. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या बीलाच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी काढून आणलेल्या आहेत. त्या बीलाच्या झेरॉक्स प्रती आयोगासमोर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्या. सदरच्या बीलाच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्त्याने आयोगासमोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले.

4. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1640-1641

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 48 नाग/2011**

श्री राजू हरिचंद्र गुरधे
मु. टेकाडी पो. गोंदेगाव
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
शक्ती प्रस जवळ रामदास पेठ, वर्धा रोड, नागपूर

2) श्री विजय अलोणे उपव्यवस्थापक
जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
शक्ती प्रस जवळ रामदास पेठ, वर्धा रोड, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2009–2010 या आर्थीक वर्षात आपल्या विभागाकडून पारशिवनी,रामटेक,मौदा या तीन तालुक्यात किती कोळसा वाटप करण्यात आला आणि सद्या या आर्थीक वर्षात किती लोकांना कोळसा देण्याची प्रक्रिया सुरु आहे याबाबत कंपनी संस्था व्यक्ती यांचे नाव व पत्त्यासह माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना दि. 30.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की आपण माहितीच्या अर्जास नियमानुसार कोर्ट फी

स्टॅम्प लावलेला नाही म्हणून अर्ज नस्तीबध्द करण्यात येत असल्याचे कळविले. तथापी माहितीच्या अर्जात ते दारीद्रय रेषेखालील आहे याचा उल्लेख करुन माहिती विनामुल्य देणे आवश्यक होते तसेच दारीद्रय रेषेखालील व्यक्तींना माहितीची फी भरण्याची आवश्यकता नाही मात्र ते दारीद्रय रेषेखालील असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामुल्य माहिती दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्या निर्णयात 15 दिवसाचे आत अपीलकर्त्याने कोर्ट फी स्टॅम्प माहिती अर्जाला लावावा आणि त्यानुसार 30 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकत्यास विनामुल्य माहिती पुरवावी असे नमुद केलेले आहे. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय देखील त्यांना मान्य नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर श्री विजय अलोणे हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 15.11.2010 रोजी त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जाची छाननी केली असता असे दिसून आले की माहिती अर्जाला अपीलकर्त्याने रु. 20/— चा स्टॅम्प लावलेला नाही.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील 15 दिवसाचे आत माहितीच्या अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावण्याचे आदेश अपीलकर्त्यास दिले. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जावर रु. 20/— चा स्टॅम्प लावलेला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

5. वास्तविक पाहता माहितीच्या अधिकारा खाली माहिती मागणारी व्यक्ती ही जर दारीद्रय रेषेखालील असेल व त्याबाबत त्यांनी दारीद्रय रेषेखालील अधिकृत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडलेले असेल तर अशा व्यक्तीकडून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (6) च्या तरतुदीनुसार अशा व्यक्तीला माहितीच्या अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाही व तसेच अशा व्यक्तीकडून माहितीचा शुल्काची आकारणी करण्यात येत नाही अशी कायदेशीर तरतुद असल्यामुळे दारीद्रय रेषेखालील व्यक्तीना माहितीच्या अर्जावर कोर्ट फी स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाही. म्हणून अपीलकर्ता हे दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना ते दारीद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती पुरवावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1643-1645

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 43 नाग/2011**

श्री राजेश अमृतलाल राजा
धनराज रेसिडेन्सी, एकोरी वार्ड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर –442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री अनिल श्रावण चहांदे
जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार
नगर परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. सपाटे यांनी बाजू मांडली. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 26.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली नझूल मोहल्ला भानापेठ चंद्रपूर येथील शिट नं. 78 प्लॉट नं.14/2, 14/3, 14/4, 35/2 या जागेवरील धनराज प्लाझाच्या अवैध व बेकायदेशीर बांधकामाबाबत माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी कळविल्या प्रमाणे त्यांनी माहितीचे शुल्क भरले आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.8.10 च्या पत्राने माहिती पुरविली. मात्र पुरविलेली माहिती अपूर्ण होती तसेच त्यांनी जी माहिती मागितली नव्हती ती माहिती त्यांना दिली. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपीलानंतरही त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही. मात्र माहितीचे शुल्क रु.300/– भरुन घेतली आणि त्यांनी जी माहिती मागितली नव्हती ती माहिती शुल्कापोटी दिली. म्हणून अपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्यामुळे त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी आणि शुल्कापोटी घेतलेले रु.300/– परत करावे अशी ॲड. सपाटे यांनी मागणी केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद चंद्रपूर श्री चहांदे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद चंद्रपूर यांच्या वतीने श्री मोहन उमाटे प्रशासकीय अधिकारी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 26.7.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन त्यांनी नझूल मोहल्ला भानापेठ चंद्रपूर येथील शिट नं. 78 प्लॉट नं.14/2, 14/3, 14/4, 35/2 या जागेवरील धनराज प्लाझाच्या अवैध व बेकायदेशीर बांधकामाबाबत दि. 2.12.2010 ला दिलेल्या नोटिसीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली आहे. व नंतर श्रीमती मदनकॅवर पारेख यांनी कोणताही revise plan दिला असल्यास त्या revise plan ची प्रत पुरविण्यात यावी तसेच revise plan मंजूर झाला किंवा नामंजूर झाला त्या आदेशाची प्रत पुरविण्यात यावी तसेच ॲड. विनायक बापट यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे समक्ष दाखल केलेल्या याचिकेत शहरातील अवैध व बेकायदेशीर बांधकाम पाडण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेले आहे. हे आदेश धनराज प्लाझा या अवैध बांधकामाला लागू होतात किंवा नाही हे कळवावे अशी माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन श्रीमती मदनकुॅवर पारेख त्यांना अवैध बांधकामाबाबत दिलेले नोटीसीची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात आली आहे. तसेच revise नकाशे नामंजूर झालेल्या पत्राची प्रत पुरविण्यात आलेली आहे. आणि धनराज प्लाझाच्या अवैध बांधकामाबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्या आदेशाची प्रत पुरविण्यात आलेली आहे. वरील प्रमाणे अपीलकर्त्यास माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली असल्याचे अपीलकर्त्याच्या वकीलांनी सांगितले. मात्र त्यांना श्रीमती मदनकुॅवर रेखचंद पारेख यांच्या बांधकामाबाबत revise plan ची प्रत मिळाली नाही त्याबाबत धारीकेतील नोटशिटची प्रत त्यांना मिळाली नाही. मात्र धनराज प्लाझाच्याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूरच्या आदेशाची प्रत त्यांना मिळाली आहे. सदरची माहिती त्यांनी मागितलेली नव्हती फक्त धनराज प्लाझाच्या बांधकामाला हे आदेश लागू होतात किंवा नाही असे विचारले होते.

5. तथापी माहितीच्या अधिकारात आदेश लागू होतात किंवा नाही असा प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देणे अपेक्षित नाही. मात्र श्रीमती मदनकुॅवर पारेख यांच्या revise plan ची प्रत तसेच revise plan नामंजूरच्या आदेशाची प्रत त्याबाबत धारीकेवर लिहीलेले नोटशिट इत्यादीची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना श्रीमती मदनकुॅवर पारेख यांच्या revise plan ची प्रत तसेच revise plan नामंजूरच्या आदेशाची प्रत आणि त्याबाबत धारीकेवर असलेले नोटशिटची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1631-1633

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 44 नाग/2011**

श्री धम्मा कालीदास निमगडे
आंबेडकर चौक मु. पो. पोंभुर्णा
ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल निकम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

2) श्री चंद्रशेखर मुधोळकर
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन इतर प्रवर्गाच्या कर्मचा–यांना अनुसूचित जाती/जमाती/भटक्या जमाती प्रवर्गातून पदोन्नती दिल्यामुळे अनुसूचित जाती/जमाती/भटक्या जमाती प्रवर्गातील कर्मचा–यांवर अन्याय झााल्यामुळे कर्मचा–यांना दिलेल्या पदोन्नती संदर्भात 1 ते 5 मुद्यांवर माहिती

मागितलेली होती. सदरची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(सा.प्र.वि.) जिल्हा परिषद चंद्रपूर श्री मुधोळकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा.) जिल्हा परिषद चंद्रपूर श्री सुनिल निकम हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 9.6.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 14.6.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही वेगवेगळया विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्या त्या विभागाकडून माहिती मागविण्यात आली. आणि सदरची माहिती वेगवेगळया विभागाकडून संकलीत केल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 4.9.2010 रोजी पुरविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली मात्र अपूर्ण माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही अपीलकर्त्याने मागितलेली मुद्या क्रमांक 1, 2, 3 व 5 ची माहिती सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत असल्यामुळे ती पुरविण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला. त्यानंतर अपीलकर्त्यास माहिती त्यांच्या कर्मचा–या मार्फत पाठविण्यात आली परंतू त्यांनी ती माहिती घेण्यास नकार दिला म्हणून त्यांना माहिती पुरविता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले .

5. तथापी आज आयोगा समोर अपीलकर्त्याने मागितलेल्या सर्व मुद्यांची माहिती आणलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे नमुद करुन सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याच्ये मान्य केले. अपीलकर्त्याने सदरची माहिती आयोगा समोर विनामुल्य उपलब्ध करुन घेतली आणि माहिती प्राप्त झाल्याबाबत समाधान व्यक्त केले.

6. अपीलकर्त्यास त्यांना पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1665-1667

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 57 नाग/2011

श्री राजेश्वर नरहर डाऊ
श्रीकृपा निवास, पाठक आयुर्वेदिक फार्मसी समोर, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री जी. आर. नागपूरे
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय
गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नझूल शिट नं.3 प्लॉट नं.27 पैकी 3.50X100=35 चौ.मि. 376 1/2 चौ.फूट मिळण्याबाबत सन 2000 पासून मागणी केलेली आहे. त्यावर जिल्हाधिकारी गोंदिया यांचे दि. 9.8.2007 च्या निर्देशाप्रमाणे कोणतेही कारण कळविण्यात आले नाही. म्हणून सदरची जागा त्यांना मिळण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही आणि कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया श्री जी. आर. नागपूरे हे उपस्थित होते. तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या वतीनेही त्यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी श्री जी. आर. नागपूरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 12.5.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 20.5.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही नायब तहसिलदार गोंदिया यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी सदरचा माहितीचा अर्ज दि. 20.5.2010 रोजी नायब तहसिलदार गोंदिया यांचेकडे हस्तांतर केला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास देवून नायब तहसिलदार गोंदिया व नझूल सर्व्हेअर गोंदिया यांचेकडे संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले. त्यानंतर सदरचा अर्ज नायब तहसिलदार गोंदिया यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपीलकर्त्यास दि. 3.6.2010 च्या पत्राने कळविले की आपले जमीन मागण्याचे अर्जानुसार सदर प्रकरणात पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी सन 2000 पासून सदरची जमीन मागणी केलेली आहे. मात्र त्याबाबत 10 वर्षाचा कालावधी लोटूनही कार्यवाही झालेली नाही. म्हणून त्यांनी नायब तहसिलदार गोंदिया यांचेकडील दि. 3.6.2010 च्या पत्राने कळविलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून प्रथम अपील अर्ज यांच्या कार्यालयातील उपजिल्हाधिकारी यांचेकडे केले. सदरचे प्रथम अपील उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी सदरचे प्रथम अपील उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे दि. 19.6.2010 रोजी पाठविले. मात्र प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे तहसिलदार गोंदिया असल्यामुळे उपविभागीय अधिकारी गोंदिया यांनी सदरचे प्रथम अपील तहसिलदार गोंदिया यांचेकडे पाठविले. मात्र तहसिलदार गोंदिया यांनी या प्रथम अपीलात सुनावणी घेतली नाही आणि निर्णयही दिलेला नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये प्रथम अपील दाखल झाल्यानंतर 30 दिवसाच्या मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. मात्र तहसिलदार गोंदिया यांनी प्रथम अपीलाचा निर्णय घेतलेला नाही म्हणून माहिती अधिकारान्वे त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून यापुढे भविष्यात याची पुनरावृत्ती करु नये अशी सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे.

4. प्रस्तूत प्रकरणात नायब तहसिलदार गोंदिया यांनी अपीलकर्त्यास दि. 3.6.2010 च्या पत्राने सदर प्रकरणात पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून अपीलकर्त्याने आता याबाबतच्या पुढील कार्यवाहीच्या संदर्भात नायब तहसिलदार गोंदिया यांचेकडे संपर्क साधणे संयुक्तीक होईल.

5. अपीलकर्त्यास दि. 3.6.2010 च्या पत्राने अपेक्षित माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत कार्यवाहीसाठी **नायब तहसिलदार गोंदिया आणि तहसिलदार गोंदिया** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1639-1641

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 58 नाग/2011**

श्री विनोद दादाजी सातपुते
शिक्षक कॉलनी गुरुनगर, भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती भद्रावती
ता. भद्रावती जि. चंद्रपूर
2) श्री विलास राजाराम भिवगडे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत घोडपेठ
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत घोडपेठ ता. भद्रावती यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली दि. 1.1.2008 ते दि. 31.7.2010 या कालावधीमध्ये ग्रामपंचायत घोडपेठच्या मासिक सभा, ग्रामसभा, आमसभा, विशेष सभा त्याची माहिती मागितलेली होती. तसेच वरील कालावधीतील प्रत्येक सभेला उपस्थित सदस्याच्या उपस्थिती पत्रकाची छायांकीत प्रत मागणी केली होती तसेच प्रत्येक मासिक सभेच्या ठरावाच्या कार्यवृतांताची साक्षांकीत प्रत मागितलेली होती. तसेच सर्व सभेच्या ठरावाच्या प्रतीची मागणी केली होती. वर नमुद केल्याप्रमाणे त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती भद्रावती

यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली परंतू त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून आता माहिती उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी यांनी विलंब केला असल्यामुळे ती माहिती त्यांना विनामुल्य पुरवावी तसेच 30 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत घोडपेठ ता. भद्रावती हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.8.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती नुसार अपीलकर्त्यास दि. 10.8.2010 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविले. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 31 महिन्याची असल्यामुळे व मासिक सभा, ग्रामसभा, आमसभा, विशेष सभा इत्यादीचे कार्यवृत्त तसेच सभेच्या नोटीस, ठरावाच्या प्रती इत्यादी माहिती मागितल्यामुळे माहितीचे स्वरुप मोठे होते. अपीलकर्त्यास रु. 5000/— माहितीची फी भरण्याबाबत दि. 10.8.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र झेरॉक्स प्रती किती आहेत याचा उल्लेख या पत्रात नव्हता अपीलकर्ता यांनी सांगितले. म्हणून त्यांनी दि. 18.8.2010 रोजी अपीलकर्त्यास पुन्हा पत्र दिले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा दि. 8.9.2010 च्या पत्राने झेरॉक्स साईज मोठा असल्यामुळे 560 प्रती रु. 8/— प्रमाणे व इतर 220 प्रती रु. 2/— प्रमाणे असे एकूण रु. 5000/— चा डी. डी. ग्रामपंचायत कार्यालयात पाठविण्याबाबत कळविले. परंतू अपीलकर्त्याने माहितीची फी भरली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती भद्रावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि त्यामध्ये देखील प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती पुरविता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आता माहिती उपलब्ध करुन देण्यास उशिर झाल्यामुळे सदरची माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीची शुल्क भरण्याबाबत पत्र दिलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबत केलेला पत्रव्यवहार हा 30 दिवसाच्या मुदतीत केलेला दिसून येतो. म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्याने प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहितीचे शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.
2) अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1643-1645

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 56 नाग/2011

श्री राजेन्द्र पंजाबराव ठाकरे
अध्यक्ष तुळजाभवानी शैक्षणीक व बहुउद्येशिय संस्था,
प्लॉट नं. 38 जगन्नाथ बाबा नगर, दाताळा रोड
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर – 442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संतोष श्रीराम गव्हाणकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर – 442401
2) जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर – 442401 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 26.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 21.2.2006 च्या दैनिक महाविदर्भ मध्ये ग्रामपंचायत आनंदवन सचिव ग्राम आरोग्य पोषण पुरवठा व स्वच्छता समिती आनंदवन तर्फे निविदा सुचना काढण्यात आली त्यामध्ये एकुण 10 वेगवेगळया कामाच्या निविदा काढण्यात आल्या त्याबाबतची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती त्यांना दि. 21.10.2010च्या पत्राने प्राप्त झाली. सदरची माहिती ही उशिराने प्राप्त झाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर श्री गव्हाणकर हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 26.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. तथापी सदरची माहिती ग्रामपंचायत आनंदवन तालुका वरोरा यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांना दि. 30.8.2010 च्या पत्राने सदरचा माहितीचा अर्ज अध्यक्ष/ सचिव ग्राम आरोग्य पोषण पुरवठा व स्वच्छता समिती आनंदवन यांचेकडे अपीलकर्त्यास माहिती देण्यासाठी पाठविला आणि त्याची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात येवून त्यामध्ये असे नमुद केले की आपला माहितीचा मुळ अर्ज ग्रामपंचायत आनंदवन यांचेकडे पाठविण्यात येत असून त्यासंबंधीची माहिती आपण ग्रामपंचायत आनंदवनकडून प्राप्त करुन घ्यावी. त्याला अनुसरुन ग्रामपंचायत आनंदवन यांनी अपीलकर्त्यास दि. 20.9.2010 चे पत्र पाठवून माहितीचे शुल्क रु. 59/– भरण्याबाबत कळविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क ग्रामपंचायतमध्ये न भरता प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे सांगितले की सदरची माहिती ग्रामपंचायत आनंदवन यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडून ती प्राप्त करुन घ्यावी. व अपीलकर्त्याने सदरची माहिती ग्रामपंचायतकडून शुल्क भरुन प्राप्त करण्याचे मान्य केले म्हणून प्रथम अपील खारीज केले. त्यानंतर अपीलकर्ता हे ग्रामपंचायतमध्ये दि. 8.11.2010 आणि दि. 21.11.2010 रोजी उपस्थित झाले. आणि त्यांनी माहितीचे शुल्क दि. 8.11.2010 रोजी रु. 44/– आणि दि. 21.11. 2010 रोजी रु. 28/– भरले आणि माहिती प्राप्त करुन घेतली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र ग्रामपंचायतने ज्या निविदा काढलेल्या आहेत त्या निविदेची सुचना एकाच देनीकेमध्ये देण्यात आली होती. आणखी इतरही दैनिकामध्ये निविदेची सुचना देणे आवश्यक होते. तसेच निविदामध्ये दिलेल्या अटी व शर्ती याचा नेमका अर्थबोध होत नाही निविदेतील चुकांच्या दुरुस्तीसाठी पुन्हा चुकीची दुरुस्ती या सदराखाली जाहीरात देणे आवश्यक होते. म्हणून काढलेल्या निविदा हे नियमाप्रमाणे नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तथापी निविदेतील अटी व शर्ती हया योग्य आहेत की अयोग्य आहेत ही बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून त्यासाठी अपीलकर्त्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी ग्रामपंचायत आनंदवन यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1648-1650

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 65 नाग/2011

श्रीमती पुष्पा बबन सिडाम
द्वारा सुभाष नवघरे नगीना बाग वार्ड नं.1
चेर खिडकी, गुरांचे दवाखाण्याससमोर चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एन. पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती चिमूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या पगारातून गृह कर्जाचा हप्ता कपात केला होता. त्याबाबतच्या चालानच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. तसेच रजा रोखीकरण मंजूर देयकाची प्रत आणि चेकच्या काऊंटरची प्रत त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 27.10.10 च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास गृह निर्माण कर्जाच्या कपाती बाबतच्या 44 चालानच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या त्याचप्रमाणे रजा रोखीकरण मंजूर देयकाची प्रत आणि चेकच्या काऊंटरची प्रत दि. 19.11.2010 रोजी त्यांना मिळाली. मात्र गृह निर्माण कर्जाच्या कपाती बाबतच्या 44 चालानच्या प्रती त्यांना

प्राप्त झाल्या. मात्र त्यांना सर्व मुळ चालान पाहावयास मिळाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 30.11.2010 रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.11.2010 रोजी देण्यात आला. त्यामध्ये असा निर्णय दिला की अपीलकर्त्यास गृह निर्माण कर्जाच्या कपाती बाबतच्या चालान पाहण्याकरीता उपलब्ध करुन द्याव्या. मात्र त्यांना सर्व मुळ चालान पाहावयास मिळाले नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती चिमूर यांच्या तर्फे श्री सकुडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चिमूर श्री पांडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.9.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र मासळ तालुका चिमूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी दि. 27.9.2010 च्या पत्रान्वये सदरच्या अर्जातील माहिती वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मासळ यांचकडे मागविली. तत्पूर्वी अपीलकर्त्यास दि. 27.10.2010 रोजी गृह निर्माण कर्जाच्या हप्त्याच्या कपात केलेल्या चालानच्या प्रती रेकॉर्ड रुममधून शोधून संकलीत केल्या आणि सदर एकूण 44 चालानच्या प्रती झेरॉक्स कॉपीमध्ये अपीलकर्त्यास दि. 27.10.2010 रोजी उपलब्ध करुन दिल्या. त्याचप्रमाणे रजा रोखीकरण मंजूर देयकाच्या प्रती आणि चेकच्या काऊंटरच्या प्रती अपीलकर्त्यास दि. 14.12.2010 च्या पत्राने पाठविल्या. कारण सदरचे बील वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मासळ यांचकडून प्राप्त करुन घ्यावे लागले.

5. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे सुनावणीत अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र चालानच्या 44 प्रती प्राप्त झाल्या एकूण 53 चालानच्या प्रती प्राप्त होणे आवश्यक होते. तथापी याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्यास ज्या 44 चालानच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या त्यामध्ये काही चालानमध्ये 2 हप्ते आणि 3 हप्ते हे एकत्र कपात केलेले आहेत. म्हणून हप्ते जरी जास्त असले तरी चालानच्या प्रती कमी आहेत. कारण 6 चालान मध्ये एकूण 11 हप्त्याची कपात केलेली आहे आणि त्याबाबतचे सविस्तर विवरण अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिललेले आहे. तसेच एकूण 53 हप्त्यापैकी अनुक्रमांक 1 ते 3 चालान त्यांचेकडे उपलब्ध नाही मात्र चालान नंबर कपात केलेली रक्कम आणि त्याची तारीख त्यांना दिललेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्यास मुळ चालान पाहावयाचे होते. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास पंचायत समितीमध्ये उपलब्ध असलेल्या मुळ चालानच्या प्रती दाखविण्यात आल्या. सदरच्या मुळ चालानच्या प्रती अपीलकर्त्याने निरीक्षण केल्या बाबत मान्य केले. मात्र 53 चालानच्या ऐवजी प्रत्यक्ष 30 चालानच्या प्रती पाहावयास मिळाल्या.

म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या 44 चालानपैकी 30 चालानची त्यांनी पाहाणी केलेली आहे बाकी 14 चालानच्या मुळ प्रती त्यांना निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या 44 चालानपैकी 30 चालानच्या मुळ प्रती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिल्या राहिलेल्या 14 चालानच्या मुळ प्रती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या.
2) अपीलकर्ती हिने कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी स्वतः अपीलकर्ता यांना चालानच्या मुळ प्रती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्या.
3) सदरची कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चिमूर यांच्या नियंत्रणाखाली करावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1652-1654

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 63 नाग/2011

श्री गौतम आडकूजी तोडे
गोल्डी झेरॉक्स सेंटर, कोर्ट रोड,
जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

2) श्री एम. ई. भगत
जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
चंद्रपूर जिल्हा मागासवर्गीय सहकारी पत संस्था मर्या., चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2011 )**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा उपनिबंधक कार्यालय यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन चंद्रपूर जिल्हा मागासवर्गीय सहकारी पत संस्था मर्या., चंद्रपूर या संस्थेची माहिती मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना संस्थेनी कोणतीही माहिती

उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक श्री भगत हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही चंद्रपूर जिल्हा मागासवर्गीय सहकारी पत संस्था मर्या., चंद्रपूरची असल्यामुळे जिल्हा उपनिबंधक चंद्रपूर यांनी दि. 6.2.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास सदरची माहिती मागण्यासाठी संबंधीत संस्थेकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 29.3.2011 रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये अपीलकर्त्याने नियमानुसार माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर संस्थेनी 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. मात्र अपीलकर्त्याने संस्थेत माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून अपीलकर्त्यास संस्थेनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे सहायक निबंधक यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी जिल्हा उपनिबंधक यांचा दि. 31.12.2010 चा प्रथम अपीलाचा निर्णय आणि संस्थेचे दि. 15.2.2010 चे माहितीचे शुल्क भरण्याबाबतचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक श्री भगत यांनी सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास जिल्हा उपनिबंधक यांचा दि. 31.12.2010 चा प्रथम अपीलाचा निर्णय आणि संस्थेचे दि. 15.2.2010 चे माहितीचे शुल्क रु. 100/- भरण्याबाबत अर्जदारास पाठविलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिली.

4. अपीलकर्ता व जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था चंद्रपूर यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 31.12.2010 रोजी दिलेला असून त्यामध्ये अपीलकर्त्याने नियमानुसार माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर संस्थेनी 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहे. तथापी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी संस्थेकडे माहितीचे शुल्क भरावे आणि अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर संस्थेकडून अपीलकर्त्यास माहिती प्राप्त करुन देण्याची कार्यवाही जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था चंद्रपूर यांनी सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1656-1658

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 64 नाग/2011**

श्री बि. व्हि. बेताल
माहिती व मार्गदर्शन कार्यालय काजीवार्ड
बस स्टॅंड समोर हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. डी. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
स. व सु. विभाग महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा
2) श्री सुनिल फडणविस
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
ग्रामीण उपविभाग महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.समुद्रपूर
ता. समुद्रपूर जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता ग्रामीण उपविभाग महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.समुद्रपूर जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सर्व्हे.नं.256 ग्राहक क्र. 397270100012 तसेच सर्व्हे.नं.11 ग्राहक क्र. 397270100853 मौजा साखरा येथील कृषी पंपाचे कनेक्शन बाबत माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले व 30 दिवसात माहिती न मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री फडणविस हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री राठोड हे उपस्थित होते.

4. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री राठोड यांनी सुनावणीत असे सांगितले की सदर अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता उपविभाग समुद्रपूर श्री आर. ए. गायकवाड यांच्या कार्यालयाकडे दि. 23.6.2010 रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. सदर जन माहिती अधिकारी हे दि. 29.4.2010 ते दि. 13.7. 2010 या कालावधीत सदर उपविभागात कार्यरत होते. त्यानंतर दि. 13.7.2010 ला त्यांनी महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. चा राजीनामा देवून त्यांनी ती नोकरी सोडली म्हणून त्यांच्या पदाचा अतिरिक्त पदभार दि. 13.7.2010 ते दि. 5.9.2010पर्यंत कनिष्ठ अभियंता श्री अन्सारी यांचेकडे होता. अपीलकर्त्यास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसात म्हणजे दि. 22.7.2010पर्यंत माहिती देणे आवश्यक होते मात्र वरील घडामोडीमुळे व अधिका–याच्या समन्वया अभावी माहिती मुदतीत अपीलकर्त्यास देता आली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री राठोड यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने दि. 24.8.2010 रोजी त्यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांनी दि. 21.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता समुद्रपूर यांना पत्र लिहून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे माहिती पाठविली. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 5.4.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे आयोगा समोर त्यांनी मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाल्याने संबंधीतावर कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत असे नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 23.6.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसात म्हणजे दि. 22.7.2010पर्यंत माहिती देणे आवश्यक होते. मात्र अपीलकर्त्यास दि. 5.4.2011 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता हे जबाबदार दिसून येतात. त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस कां करण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी करणे संयुक्तीक होईल. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.4.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली दिसते. म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. सदरच्या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस कां करण्यात येवू नये याचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी विलंबास जबाबदार असणा–या तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे खुलासा करण्यासाठी त्वरीत पाठवावी. आणि हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विलंबाबद्यल आयोगाकडे खुलासा करण्यास कळवावे.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली नाही म्हणून याबाबत त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1660-1662

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 69 नाग/2011**

श्री मंगेश विजय वनवे
भुखंड क्र. 24, अनुशक्ती नगर गायत्री कॉलनी
हजारीपहाड ते भिवसेन खोरी रोड
हजारीपहाड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. हस्तक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
जलप्रदाय विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री के. रा. मिश्रा
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
जलप्रदाय विभाग धरमपेठ झोन क्र.2, महानगर पालिका नागपूर
राजाराम वाचनालय, गोकुळपेठचे मागे म.न.पा.शाळा इमारत
गोकुळपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

2. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता जलप्रदाय विभाग धरमपेठ झोन क्र.2, महानगर पालिका नागपूर श्री के. रा. मिश्रा हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री हस्तक हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 13.8.2010 चा माहिती अधिकारा खलील अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने ख. क्र. 68 मौजा हजारीपहाड वार्ड नं. 68 मधून प्रिती को.ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मधील पाण्याची पाईप लाईन व पाणी पुरवठयाबाबत 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्र. 1 मधील पाण्याच्या आकारा बाबतची माहिती मागितलेली होती. सदरची माहिती कर विभागाशी संबंधीत असल्यामुळे कर विभागास दि. 8.9.2010 रोजी पत्र लिहून त्यांचेकडून माहिती मागितली. त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास कर विभागाची आणि जन माहिती अधिकारी यांच्या विभागाची माहिती एकत्रित संकलीत करुन दि. 13.9.10 च्या पत्राने 1 ते 4 मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्या बाबतची पोच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत दाखविली.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता जलप्रदाय विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे दि. 1.11.2010 रोजी दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 15.10.2010 रोजी देण्यात आला. त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दस्तऐवजाच्या संदर्भात काही कागदपत्र असल्यास त्यांच्या छायांकित प्रती 7 दिवसात देण्याचे आदेश दिले.

5. प्रथम अपीलाच्या दि. 15.10.2010 च्या निर्णयाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 19.10.10 च्या पत्राने सुधारीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. आणि त्यामध्ये मुद्येनिहाय खुलासा पुन्हा दिला.

6. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.9.10 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर देखील पुन्हा दि. 19.10.10 च्या पत्राने सुधारीत माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1664-1665

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 67 नाग/2011**

श्री दिना साहागूजी सोनवाने
मु. पो. सेंदूरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शिवराज धोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री सी. आर. वाघ
जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक
राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.11.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे सुनावणी संपल्यानंतर हजर झाले. मात्र जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग नागपूर सी. आर. वाघ हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग नागपूर श्री शिवराज धोटे हे हजर आहेत. अपीलकर्ता हे सुनावणीनेतर हजर झाले. आणि त्यांनी असे सांगितले की त्यांनी श्री दिगंबर नेवारे या कर्मचा–या विषयी दि. 10.5.2010 ला तक्रार अर्ज दिला होता त्या तक्रार अर्जाच्या संबंधाने श्री दिगंबर नेवारे यांचेवर फक्त ठपका ठेवलेला आहे. त्याचा दोन दिवसाचा पगार कपात करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री दिगंबर नेवारे या कर्मचा–याच्या संबंधात त्यांनी दि. 10.5. 2010 रोजी तक्रार अर्ज दिली होती. त्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.8.10 च्या पत्राने अपीलकर्त्यास केलेल्या कार्यवाहीची कार्यालयीन टिपणीच्या 1 ते 5 पानाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या. आणि त्यामध्ये असे नमुद केले की श्री दिगंबर नेवारे यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1980 च्या नियम 5 (1) मधील किरकाळ शिक्षेअंतर्गत ठपका ठेवण्याची शिक्षा करण्यात आली असून त्याबाबत श्री सोनोने यांना कळविण्यात आले असून त्याबाबतची नोंद श्री दिगंबर नेवारे यांचे सेवा पुस्तकात करण्यात आली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी श्री दिगंबर नेवारे यांचे विरुध्द पुन्हा कार्यवाही करणे उचित होणार नाही याबाबतचे कागदपत्र अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेले आहे.

3. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 3.11.2010 रोजी घेण्यात आली आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील फेटाळण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की श्री सोनोने यांना दिलेली शिक्षा ही सौम्य स्वरुपाची आहे त्याचा दोन दिवसाचा पगार कपात करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे असे अपीलकर्त्याने नमुद केले..

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 10.8.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 23.8.2010 च्या पत्राने सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दिलेल्या माहिती मध्ये श्री सोनोने यांच्यावर तक्रारीच्या संदर्भात फक्त ठपका ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांची शिक्षा ही सौम्य स्वरुपाची आहे. त्यापेक्षा कडक शिक्षा श्री सोनोने यांच्यावर होणे आवश्यक आहे. तथापी श्री सोनोने यांच्या तक्रारीच्या संदर्भात त्यांच्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती ही अपीलकर्त्यास उपलब्ध झालेली आहे. मात्र त्यापेक्षा कडक कार्यवाहीची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1667-1668

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 66 नाग/2011**

श्री जगन्नाथ बळवंतराव दलदले
प्लॉट क्र. 12 अयोध्यानगर बस स्टॉप,
न्यु सुभेदार रोड गल्ली क्र. 3 नागपूर
ता. जि. नागपूर –440024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री संजय वामन पवार
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 10.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय मौदा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 28.4.2010 रोजी निवेदन देवून तक्रार केली होती. त्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार मौदा श्री संजय पवार हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 13.8.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने इस्तगासा क्र. 504/2009 मधील श्री एस.व्ही.आगलावे यांचे बयान आणि श्री एस.व्ही.आगलावे यांनी सेवेत रुजू होतांना घेतलेल्या शपथेचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर केलेली कार्यवाही इत्यादीची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 20.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की पोलीस स्टेशन मौदा यांचेकडून इस्तगासा क्र. 504/2009 हया कार्यालयास प्राप्त झाले परंतू त्यात तलाठी श्री एस.व्ही.आगलावे यांचे बयान संलग्न नाही तसेच आपल्या माहिती अर्जातील मुद्या क्र.1 नुसार आपले दि. 28.4.2010 चे तसेच जिल्हाधिकारी नागपूर यांचे दि. 8.6.2010 चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले नाही असे कळविले. त्याचप्रमाणे मुद्या क्र.2 नुसार तलाठी श्री एस.व्ही.आगलावे यांनी रुजू होतांना दिलेल्या कोणत्या शपथेचे उल्लंघन केले

याबाबत स्पष्ट लिहिलेले नाही तसेच मुद्दा क्र.3 नुसार तलाठी श्री एस.व्ही.आगलावे यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही या कार्यालया मार्फत करण्यात आलेली नाही असे अशी सविस्तर माहिती अपीलकर्त्यास तहसिलदार मौदा यांनी दि. 20.8.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र त्यांना दि. 28.4.2010 रोजी दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार मौदा यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचे दि. 28. 4.2010 चे निवेदन त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही. सदरच्या निवेदनाची प्रत अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांना आयोगा समोर उपलब्ध करुन दिली. सदरच्या निवेदनाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त केली. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचे दि. 28.4.2010 चे निवेदनावर योग्य ती चौकशी करुन त्याबाबत केलेली कार्यवाही कळविणे योग्य होईल.म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्त्याचे दि. 28.4.2010 चे निवेदनावर सविस्तर चौकशी जन माहिती अधिकारी यांनी करावी आणि चौकशी करुन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1670-1671

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 68 नाग/2011**

श्री हरीभाऊ गणपतराव माटेटवार
टेलीफोन नगर प्लॉट नं.30, ओम आटा चक्की
नरसाळा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(वाहतुक)
पश्चिम विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एच. एस. उंबरकर
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(वाहतुक)
वाहतुक पूर्व विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.4.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त(वाहतुक) वाहतुक पूर्व विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री मनोहर चचाणे या पोलीस शिपायाची वाहतुक शाखेच्या नेमणूकीबाबत अ, ब, क व ड या 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना दि. 28.8.10 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू सदरची माहिती ही दिशाभूल करणारी व चुकीची असल्याचे नमुद केले म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त श्री उंबरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(वाहतुक) पश्चिम विभाग, नागपूर यांच्या वतीने श्री मोरे पोलीस निरीक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 31. 7.2010 प्राप्त झाला. अपीलकर्त्याने सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पूर्व वाहतुक विभाग, नागपूर श्री मनोहर चचाणे यांच्या वाहतुक शाखेच्या नेमणूकीबाबत अ, ब, क व ड या 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 23.8.2010 च्या पत्राने मुद्या क्र. 2 अ, ब, क व ड ची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र सदरची माहिती देतांना सदरच्या माहितीचा उपभोग कोणत्याही प्रोसीडींगच्या कामासाठी करता येणार नाही असा शिक्का मारुन माहिती दिलेली आहे म्हणून सदरचा शिक्का हा चुकीचा आहे असे अपीलकर्त्यांने सुनावणीत नमुद केले. वास्तविक पाहता सदरची माहिती वर जन माहिती अधिकारी यांनी असा शिक्का मारणे चुकीचे आहे कारण माहितीच्या अधिकारात मिळवलेल्या माहितीचा उपभोग अपीलकर्ता कोणत्याही कामासाठी पुरावा म्हणून वापर करु शकतो म्हणून जन माहिती अधिकारी यांनी असा शिक्का न मारता सुधारीत माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तसेच मुद्या क्र. 'ब' बाबत श्री मनोहर चचाणे हे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर असतांना वाहतुक शाखेत नेमणूक नव्हती ही दिलेली माहिती खोटी असल्याचे अपीलकर्त्यांने सुनावणीत नमुद करुन असे सांगितले की श्री मनोहर चचाणे यांची या शाखेत नेमणूक होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की श्री मनोहर चचाणे हे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर असतांना वाहतुक शाखेत नव्हते मात्र सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर असतांना त्यांची नेमणूक होती. मात्र अपीलकर्त्यांने ते पोलीस हेड कॉन्स्टेबल असतांना ची माहिती मागितलेली आहे. म्हणून श्री चचाणे हे पोलीस हेड कॉन्स्टेबल असतांना त्यावेळी ते वाहतुक शाखेत त्यांची नेमणूक नव्हती अशी माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. त्याचप्रमाणे अपीलकर्त्यांने प्रथम अपील पोलीस उपआयुक्त यांचेकडे दाखल केले. पोलीस उपआयुक्त वाहतुक यांचा प्रथम अपीलाचा निर्णय दि. 19.10.2010 रोजी अपीलकर्ता यांना पाठविण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की वाहतुक शाखेत पोलीस कॉन्स्टेबल यांना चालान करण्याचे अधिकार प्रदान केलेले नाही तसेच त्यांना चालान बुक सुध्दा देण्यात आलेले नाही अशी माहिती अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयात दिलेली आहे. मात्र याबाबतही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की वाहतुक विभागातील पोलीस कॉन्स्टेबल यांना चालान करण्याचे अधिकार प्रदान केलेले नसतांनाही ते चालान करतात तसेच चालान बुक सुध्दा त्यांच्या जवळ देण्यात आले असते असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतू त्याबाबतचा कोणताही पुरावा अपीलकर्ता यांनी आयोगा समोर सादर केलेला नाही.

5. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या म्हणण्या नुसार वाहतुक विभागातील पोलीस कॉन्स्टेबल यांना चालान करण्याचे अधिकार प्रदान केलेले नसतांनाही ते त्या पदाचा वापर करीत असतील तर त्याबाबत योग्य त्या पुराव्यासह अपीलकर्त्याने सक्षम अधिकारी यांचेकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी जन माहिती

अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 23.8.2010 व दि. 19.10.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीवर वर नमुद केलेला शिक्का मारणे चुकीचा आहे म्हणून अपीलकर्त्यास दि. 23.8.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती सुधारीत करुन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्त्यास दि. 23.8.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती ही सुधारीत करुन म्हणजे वर नमुद केल्याप्रमाणे शिक्का न मारता विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1673-1675

जा.क्र.—————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 49 नाग/2011**

श्री हरीशचंद्र गोपाळराव वैरागडे
श्री भक्तीसागर निळकंठ खोब्रागडे
प्लॉट नं. 229 उंटखाना ले–आऊट
श्री मिलींद गाणार यांचे घराजवळ नागपूर
ता. जि. नागपूर –440001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रा. शा. कराडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक,
हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 8.4.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन उंटखाना नागपूर येथील किती लोकांना www.emc.org.in या इंटरनेट संकेतस्थळावर जावून त्यांच्या मालमत्तेचे पुर्नमुल्यांकन केलेले आहे अशा लोकांची नावासहीत यादी त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना दि. 12.7.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की अशा लोकांच्या भरलेल्या माहितीची नावासहीत यादी उपलब्ध नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक श्रीमती नेरकर हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री कराडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 1.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 12.7.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये असे नमुद केले की www.emc.org.in या इंटरनेट संकेतस्थळावर जावून मालमत्तेचे स्वयं (करनिर्धारण) पुर्नमुल्यांकन केलेले आहे अशा लोकांची नावासहीत यादी त्यांचेंकडे उपलब्ध नाही. कारण अपीलकत्याने मागितलेल्या क्षेत्रातील कोणत्याही नागरीकाने या वेबसाईटच्या इंटरनेट संकेतस्थळावर जावून मालमत्तेचे पुर्नमुल्यांकन केलेले नाही म्हणून त्याची यादी जन माहिती अधिकारी यांचेंकडे नावासहीत उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास कळविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री कराडे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की महानगर पालिकेने नागरीकांना कर भरण्याची सुविधा सोपी व्हावी म्हणून मालमत्तेचे पुर्नमुल्यांकन करुन घेण्यासाठी वेबसाईट तयार केलेली आहे. ज्या वेबसाईटवर नागरीकांना त्यांच्या मालमत्तेचे पुर्नमुल्यांकन करावयाचे आहे त्यांनी त्या वेबसाईटवर जावून कार्यवाही करावयाची आहे. त्यासाठी ज्या नागरीकांना वेबसाईटचा वापर करता येत नाही त्यासाठी महानगर पालिकेने 600 सेंटर्सवर कर भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की महानगर पालिकेने कर भरण्यासाठी तयार केलेली वेबसाईटची प्रणाली ही बंद असते त्याचा कोणताही उपयोग नागरीकांना होत नाही. त्यामुळे सदर प्रणाली ही बंद करण्यात यावी अशी अपीलकर्त्याची मागणी आहे. यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की नागरीकांच्या सोयीसाठीच सदर प्रणाली महानगर पालिकेने तयार केलेली आहे. आणि अपीलकर्ता ज्या क्षेत्रात राहातो त्या क्षेत्रात या प्रणालीचा नागरीक लाभ घेत नसेल तर शहरातील इतर भागातील नागरीक या प्रणालीचा लाभ घेत आहेत.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 12.7.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदरच्या प्रणालीच्या उपयुक्ततेची आणि गुणवत्तेची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यासाठी अपीलकर्त्याने सक्षम अधिका–याकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 12.7.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1677-1679

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 81 नाग/2011**

श्री गणेश प्रभाकरजी रेवतकर
मु. वडा(उमरी) पो. खरसोली
ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(उद्योग)
पंचायत समिती नरखेड
ता. नरखेड जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी सचिव
ग्रामपंचायत वडा(उमरी)
ता. नरखेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वडा(उमरी) ता. नरखेड जि. नागपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2009—2010 मध्ये ग्रामपंचायत वडा(उमरी) यांनी खरेदी केलेल्या खुर्च्या बाबतची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 16.9.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली परंतू खुर्च्या खरेदीचे बील हे गणेश एन्टरप्रायझेसच्यो दिले मात्र खुर्च्या खरेदी करण्याचा ठराव हा गणेश एन्टरप्रायझेस ॲन्ड म्युझीक सेंटर नरखेड यांच्या नावाचा होता. मात्र खरेदी बील हे गणेश एन्टरप्रायझेस यांच्या नावाचे दिले म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत वडा(उमरी) ता. नरखेड कु. एस. एस. पाटील हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(उद्योग) पंचायत समिती नरखेड हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे त्याच दिवशी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही काढण्यात आली आणि ती संपूर्ण माहिती दि. 16.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे यांनी सुनावणीत मान्य केले. खुर्च्या खरेदीचे बील हे गणेश एन्टरप्रायझेस ॲन्ड म्युझिक सेंटर नरखेड या ऐवजी गेणश एन्टरप्रायझेस या नावाने दिले. तथापी आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी सदरचे बील दाखविले तेव्हा असे दिसून आले की सदरच्या खुर्च्या खरेदीचे बीलावरती इंग्रजीत

गणेश एन्टरप्रायझेस असे आहे. व त्याच्या शेजारी त्या बीलावर मराठीत देखील गेणश एन्टरप्रायझेस असे छापलेले आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ग्रामपंचायत कार्यालयाकडे ज्या स्थितीत सदरचे बील उपलब्ध आहे त्या स्थितीतीलच दि. 31.3.2009 च्या बीलाची प्रत अपीलकर्त्यास दिलेली आहे. मात्र अपीलकर्ता यांचे याबाबत म्हणणे असे आहे की गणेश एन्टरप्रायझेसचे मुळ बील हे दि. 16.3.2009 चे होते. ते बील ग्रामपंचायत कार्यालयाकडे दिलेले होते. ते बील गहाळ करुन त्या ठिकाणी दि. 31.3.2009 चे बील लावलेले आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सद्यस्थितीत त्यांच्या रेकॉर्डला दि. 31.3.2009 चे बील आहे. आणि त्या बीलाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. माहितीच्या अधिकारान्वये ग्रामपंचायतकडे उपलब्ध असलेल्या बीलाची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1681-1682

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 78 नाग/2011**

श्री जनार्दन गुलाबराव मून
केन्द्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,
नागसेनवन 791 नागपूर
ता. जि. नागपूर –440 017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एम. जैन
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री एस. जे. मडावी
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय कारंजा(घाडगे)
ता. कारंजा जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.4.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय कारंजा(घाडगे) ता. कारंजा जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा हेटीकुंडी ता. कारंजा शेत सर्व्हे नं.177 आराजी 2.29 हे शेत चरणदास नत्थूजी बनसोड यांच्या वारसात असल्याने या फाईलची संपूर्ण कागदपत्रे त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र श्री नत्थूजी बनसोड यांच्या नावाने फेरफार झाल्याची कागदपत्रे त्या फाईल मध्ये मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज करण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कारंजा श्री मडावी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आर्वी श्री आर. एम. जैन हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कारंजा यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 24.8.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याला त्यांनी मागितलेली माहिती काढण्यात आली आणि दि. 9.9. 2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती पाठविण्याचे पत्र तयार करुन अपीलकर्त्यास माहितीची फी रु. 62/– भरण्याबाबत कळविण्यात आले. मात्र अपीलकर्त्याने माहितीची फी रु. 62/– भरणा

करण्यासाठी ते कार्यालयात आले नाही. म्हणून अपीलकर्त्यास दि. 9.9.2010 च्या पत्राद्वारे माहिती दि. 13.9.2010 रोजी पोस्टाने माहिती विनामुल्य पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी नमुद केले. मात्र सदरची जमीन साकसबाई नत्थूजी बनसोड यांच्या नावाने फेरफार झाल्याबाबतचे कागदपत्र त्यांना मिळाले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचा फरफार हा मृत्युपत्रावरुन झालेला आहे तसेच नायब तहसिलदार यांचा दि. 22.5.2010 च्या आदेशाप्रमाणे ही कार्यवाही झालेली आहे. सदरची माहिती ही अपीलकर्त्यास दि. 9.9.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्यास मृत्युपत्राची प्रत मिळालेली आहे मात्र नायब तहसिलदार यांचा दि. 22.5.2010 च्या आदेशाची प्रत मिळालेली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की पुन्हा अपीलकर्त्यास नायब तहसिलदार यांचा दि. 22.5.2010 च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देण्यास त्यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलकर्ता यांना नायब तहसिलदार यांचा दि. 22.5.2010 च्या आदेशाची प्रत विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1684-1685

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 80 नाग/2011

श्री पॅंथर प्रकाश बन्सोड
अध्यक्ष, भारतीय दलित पॅंथर
पॅंथर मुख्यालय, उंटखाना चौक,
डॉ.भदंत आनंद कौसल्यायन मार्ग, नागपूर
जि. नागपूर –440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(समन्वय)
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, (समन्वय)
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.4.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, (समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकाशन समितीच्या प्रकाशीत खंड 22 करीता संपादक म्हणून हरी नरके यांना नेमण्याच्या निर्णयाची शासन आदेश प्रत आणि खंड 22 मध्ये सदस्य सचिव प्रा. दत्ता भगत यांच्या जबाबदारीची निश्चीती बाबत सविस्तर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होवूनही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही. मात्र त्यानंतर दि. 30.3.11 च्या पत्राने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकाशन समिती मुंबई यांचेकडून माहिती उपलब्ध झाली मात्र सदरची माहिती अर्धवट व चुकीची आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, (समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई श्री म. हीं. बनसोडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(समन्वय) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या वतीने श्रीमती महादूरे उपसंचालक हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी श्री म. हीं. बनसोडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 20.8.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 1.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकासन समिती मुंबई यांचेशी संबंधीत असल्यामुळे सदरचा अर्ज दि. 13.10.2010 च्या पत्राने सदस्य सचिव डॉ.बाबासाहेब चरीत्र साधने प्रकासन समिती मुंबई यांचेकडे पाठवून अपीलकर्त्याला सदरची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचेशी संपर्क साधण्यासाठी कळविण्यात आले. सदरच्या माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 1.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडे आदर्श शिक्षक पुरस्काराबाबतच्या माहितीचे काम युध्दपातळीवर त्यांचेकडे सुरु होते म्हणून अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज हस्तांतर करण्यास उशीर झाला. तथापी सदरचा अर्ज दि. 13.10.2010 च्या पत्राने हस्तांतर केला. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकासन समिती मुंबई यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास दि. 30.3.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यातील माहिती अपूर्ण आहे त्यांना अद्यापही सन 1996 ते 1990 या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकासन समिती मुंबईसाठी ज्या कर्मचा–याने काम केले आहे त्याची माहिती त्यांना मिळाली नाही. व श्री हरी नरके यांच्या संपादक पदाच्या नियुक्तीबाबतची तसेच या संहीतेत दुरुस्त करण्याबाबत सुचना प्राप्त झाल्याची माहिती त्यांना अद्यापही मिळाली नाही. म्हणून अपीलकर्ता यांना ही माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खालील मुद्यांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
   1) सन 1996 ते 1990 या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकाशन समिती मुंबईसाठी ज्या कर्मचा–यानी काम केले आहे त्याची माहिती द्यावी.
   2) श्री हरी नरके यांच्या संपादक पदी नियुक्ती झाल्याबाबतची वस्तुस्थिती कळवावी.

3) या संहीतेत दुरुस्त करण्याबाबत सुचना प्राप्त झाली असल्यास त्या सुचनेची प्रत व त्या सदस्याचे नाव देण्यात यावे.

4) श्री हिंगे यांना संहिता पाठविल्याची तारीख नमुद करावी.

2) जन माहिती अधिकारी यांचेकडे अपीलकर्त्याचा दि. 20.8.2010 चा माहितीचा अर्ज पोस्टाने दि. 1.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जावर 30 दिवसाचे आंत कार्यवाही करणे आवश्यक होते. मात्र जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या मुदतीत या अर्जावर कार्यवाही केलेली दिसून येत नाही. सदरचा अर्ज दि. 13.10.2010 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरीत्र साधने प्रकासन समिती मुंबई यांचेकडे विलंबाने पाठविली याबाबत जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की या कालावधीत आदर्श शिक्षक पुरस्काराबाबतच्या कार्यक्रमाची कार्यवाही सुरु होती. म्हणून सदरच्या अर्जावर 30 दिवसात कार्यवाही करता आली नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही म्हणून झालेल्या विलंबाबद्यल ते दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1687-1689

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 42 नाग/2011

श्री मारोती भाऊरावजी चंदनखेडे
प्लॉट नं. 1, अशोक कॉलनी
पो. खामला नागपूर
ता. जि. नागपूर –25 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रबंधक
उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री जी. एम. खापरे
जन माहिती अधिकारी
उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप प्रबंधक मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन खालीलप्रमाणे दोन मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

Please supply to me the following information :-

(1) As to how many chances of interview for promotion to the post of Chief Translator & Interpreter have been given to me i.e. this applicant viz. M.B. Chandankhede and on what date and (2) whether I was debarred from giving further informations for promotion to the to the post of Chief Translator & Interpreter.

तथापी त्यांना जन माहिती अधिकारी त्यांनी दि. 26.8.2010 च्या पत्राने मुद्दा क्र.1 ची माहिती उपलब्ध करुन दिली. आणि मुद्दा क्र.2 ची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रबंधक मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ नागपूर यांचेकडे दाखल केले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना मुद्दा क्र.1 चीच माहिती प्राप्त झाली आणि मुद्दा क्र.2 ची माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यासाठी त्यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे लेखी युक्तीवाद सादर केला.

1. That on 2.8.2010 I the applicant/appellant had moved an application to the Public Information Officer, High Court Bench at Nagpur under the Right to Information Act, 2005 stating therein as to how many chances of interview for promotion to the to the post of Chief Translator & Interpreter had been given to me i.e. to this applicant/appellant and on whate dates ad 2) As to whether I was debarred from giving further interview for promotion to the to the post of Chief Translator & Interpreter.

2. That the Public Information Officer on 26.8.2010 rejected my aforesaid application. That being aggrieved by the said Order I the appellant on 24.9.2010 preferred the First Appeal vide F.A.No.16/2010. The Honourable First Appellate Authority decided my said Appeal vide its Order dtd. 15.10.2010 which has been communicated to me by a covering letter dtd. 24.11.2010. The copy of the said Order is enclosed herewith for your honour's kind perusal. The First Appellate Authority supplied to me the information on point No.1 only of my application dt. 2.8.2010 snd Point No.2 has been decided correctly.

3. That the First Appellate Authority on page No.4 of its Order stated that, "by the time, the vacancy of the post of Chief Translator & Interpreter arose after January 2004, the fresh process started for filling up the vacancy, the applicant had already retired. Therefore, there was no question of calling him for the interview. Had he been in service on the date, when the vacancy further arose after January 2004, for the post of Chief Translator & Interpreter he would have been called for the interview.

4. That, I say and submit that I perused the aforesaid contents very carefully and came to the conclusion that, the Honourable First Appellate Authority has mistaken considered the date of my retirement as January 2004 which is totally wrong. I in fact retired from the service on 28.2.2007. I already enclosed the concerned document received from the Senior

Accounts Officer, Office of the Accountant General, (A & E-II) Maharashtra, Nagpur, in it is mentioned the date of my retirement as 28.2.2007. Payment of pension/Family pension should commence from 1.3.2007. I have enclosed the documents along with the Second Appeal No.42/2011. I further submit that, my written test was conducted on 16.1.2004, and viva was conducted on 17.1.2004. The Honourable Selection Committee was comprising of the Honourable justices J.N.Patel and D.D.Sinha, and the question paper was different from the interview of Smt. C.N.Bharadwaj, Shri K.S.Behere, Shri S.B.Lambe and Smt. S.D.Andhare, which was conducted on 19.4.2004 and 21.4.2004 i.e. 93 days after my interview dtd. 16.10.2004.

5. I was not communicated the result of the said interview. On 21.1.2004 Smt. C.N.Bharadwaj, Shri K.S.Behere, Shri S.B.Lambe and Smt. S.D.Andhare had made the common representation to bring them under the zone of consideration. Their representation was considered, and they were brought under the zone of consideration. In fact, they were not eligible for the for the interview to the post of Chief Translator & Interpreter as per Rule 10 of the Bombay High Court Appellate Side Service Rules 2000. Then their interview was conducted on 19.4.2004 and their viva voce was conducted on 21.4.2004 for the promotion to the post of Chief Translator & Interpreter, but at that time I was not called for interview along with them on the said date though I as in service as a Dy. Chief Translator & Interpreter as other officials/officers were given number of chances to the extent of 3-13 chances of interview, and that they were not debarred from giving interview from promotion to the higher post.

6. I further submit that, The Honourable Selection Committee of interview dtd. 19.4.2004 and 21.4.2004 was comprising of the Honourable justices J.N.Patel and D.D.Sinha, and the question paper of the said interview was also different from the interview in which I appeared on 16.1.204. The interview dtd. 19.4.2004 has been conducted after 13 days from the date of my interview dtd. 16.1.204. Therefore under any circumstances and condition also the process of both the interviews cannot be the same and thus it is false to say that, the process of both the interviews is one and the same as mentioned in the written submission on behalf of the respondents dtd. 1.4.2011. I further submit that the Public Information Officer on 26.3.2010 on his own informed me that, Shri G.S.Jangade was

called for interview on 12 times and he was not debarred from promotion to the post of Section Officer. In the same way, the Public Information Officer on 20.1.2009, informed me on his own that Smt. A Garud, Shri B.N.Ujjainwar, and Shri U.M.Karikar were called for interview for 3-4 times and they were not debarred for promotion. I have enclosed the said documents along with the Second Appeal at page No.30-31 and page No.32-34 but both the respondents have declined to give me information on point no.2 of my application dtd. 20.8.2010. Though the information is available, they are hinding the said information. The aforesaid persons and myself are the employees of the same authority even then the respondents are giving to me the differential treatment as discussed above at thength. The order passed by the Hon'ble High Court in C.A.No.3902/2005 on 7.7.2005 is not applicable to the information to be sought under R.T.I. Because PIO has supplied to me sewered documents under RTI 2005.

In view of the above, the process of both the interviews cannot be one and the same, and the respondents should supply to me the information as per point No.2 of my application dtd. 2.8.2010 and they should be directed accordingly.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप प्रबंधक श्री जी. एम. खापरे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे खालीलप्रमाणे लेखी युक्तीवाद दाखल केला आहे.

1. As to para 1 :- The contentions raised by the appellant in this para are the matter of record.

2. As to para 2 :- The appellant in his application dated 2.8.2010 sought the information (1) as to how many chances of interview for promotion to the post of Chief Translator has been given to him and on what date. (2) Whether he was debarred from giving further interviews for the post of Chief Translator & Interpreter. In this regard, the appellant has been communicated the order passed by P.I.O. on 26.8.2010 below Appln. No. 72/2010 vide office letter dated 26.8.2010. The order of P.I.O. is self explanatory and needs no further comments on it. The copy of order of P.I.O. dated 26.8.2010 is annexed herewith at ANNEXURE-R-1.

3. As to para 3 :- The contents of this are the matter of record. The order of First Appellate Authority dated 15.10.2010 is self explanatory. The copy of order is annexed herewith at ANNEXURE-R-2.

4. As to para 4 :- The contents on pg. No.4 of record. The order of First Appellate Authority dated 15.10.2010 are the matter of record, needs no comments.

5. As to para 5 :- The contents of this are denied. However, the appellant has misinterpreted the order passed by the First Appellate Authority. In this regard the respondents will explain in detail in specific pleas.

6. As to para 6 :- The contents of this are the matter of record.

7. As to para 7 :- The contents of this are denied in toto.

8. As to para 8 to 11 :- The contents of this are denied in toto. Since the appellant has only clarified in respect of his say in appeal.

9. As to para 12 :- The contents of this are denied. The appellant has misinterpreted the order of First Appellate Authority.

SPECIFIC PLEAS

(A) In response to the application of the applicant under R.T.I.Act, the appellant was informed by Public Information Officer vide order dated 2.8.2010 as to point No.1 that he was called for written test only on 16.1.2004 and personal interview was held on 17.1.2004. Had the appellant been called subsequently, he would have been informed accordingly. Thus, it is clear that the appellant was called for interview and written test on 16.1.2004 and 17.1.2004 only, which suffice the purpose of the appellant. The appellant knows himself that he got one chance, despite this, the appellant by one or the order way seeking the same information again and again. The orders of P.I.O. and First Appellate Authority and self explanatory in this regard.

(B) The respondents submit that the information as to point No.2 of the application is not available on record. It is submitted that the Act does not make it obligatory on the part of public authority to create the information for the purpose of its dissemination. Answering question of proffering advice or making suggestion to the appellant is clearly beyond the purview of Right to Information Act. So also the P.I.O. relied on the decision of Full Bench of Central Information Commission is Appeal No.CIC/AT/A/2006/00588, which is clearly applicable to the present case. Besides, justification and reasons about the things was done or not done are not come within the purview of RTI Act. The respondent relied upon the

judgment reported in 2008(4) Bom.C.R.328 Celsa Pinto(Dr.) –vs- Goa State Information Commission.

(C) Moreover, it is pointed out that the appellant has referred the other applications in respect of seeking information about the officials working in this Hon'ble High Court. The P.I.O. vide order dated 20.1.2009 and 26.3.2010 informed the appellant that those candidates were called for viva-voca as and when the vacancy of the said post arose on the dates and as they were not debarred. These candidates were repeatedly called for interview for the same post only, because there existed vacancy during their tenure of service. As far as appellant is concerned, the appellant was called for written test on 16.1.2004 and personal interview on 17.1.2004 for the post of Chief Translator & Interpreter. He was not found suitable in that interview. By the time vacancy of the post of Chief Translator & Interpreter arose subsequently and fresh process was started for filling up vacancy, the appellant had already retired. Therefore, there was no question of calling him for interview. The order of Appellate Authority in this regard is very clear. However, the appellant has misinterpreted the order. He is presuming that the fresh process on secod occasion had started for filling up vacancy of the post of Chief Translator & Interpreter, during this tenure, which is incorrect. Therefore, there is no substance in his second appeal and the same deserves to be dismissed.

(D) Apart from it, the appellant requires the information for the purpose of amendment to W.P.No.3705/2004. However, the appellant had filed Civil Application No.8375/2004 praying to supply the copy of representation dated 22.1.2004 of the officials. The said civil application was listed before the Hon'ble Court consisting of Honourable S/Shri Justices P.S.Brahme and B.R.Gavai on 1st March 2005. The Hon'ble Court has been pleased to pass the following order:

"Having heard the learned Counsel for the petitioner at length so also the learned A.G.P. For respondent No.2 and having gone through the contents of the application, **we feel that instead of allowing the petitioner to get the copies of the documents as sought for, in the interest of justice, it would be appropriate to direct the respondent no.1 to keep the relevant file ready for perusal at the time of admission of the petition. It is also made clear that the counsel for the petitioner would be granted inspection of the documents, if sought for.**

Put up the matter for admission after two weeks

Steno copy of the order be furnished to the learned AGP to act upon."

(E) Pursuance to said order, the counsel for the appellant and the appellant himself took the inspection of the said documents on 18.3.2005. Subsequently, said Civil Application was listed before the Honourable Court for orders on 21.4.2005 and the following orders has been passed:-

**"Civil Application is not pressed"**

(F) Again, the appellant filed Civil Application No.3902/2005 praying for identical relief to supply the copy of representation dated 22.2.2004. The said Civil Application was listed before the Honourable Court consisting of the Honourable S/Shri Justices F.I. Rebello & N.A.Britto and the Honourable Court has passed the following order on 7.7.2005.

**"Challenge in the petition is to the promotion of Respondent No.2. The request in the Civil Application is for documents. That cannot be considered at this stage. At the time of hearing of the petition if the records are required they may be called for. Records may be kept available at the time of hearing of the petition. With the above observation Civil Application stands disposed off."**

(G) Thereafter, again, the said Civil Application i.e. 3902/2005 was listed before the Honourable Court consisting of the Honourable S/Shri Justices P. S. Brahme and B.R.Gawai for review of order dated 7.7.2005 and the Honourable Cour on 26.8.2005 passed the following order:-

"Heard.

Bh way of present Civil Application, the petitioner seeks review of the passed by this court dated 7.7.2005 thereby disposing of the Civil Application 3902/2005. By the said Civil Application, , the petitioner had requested for supply of certain documents. However, this Court disposed of the said Civil Application cannot be considered at this stage. This Court further observed that at the time of hearing of the petition if the records are required then they may be called for.

We are of the considered view that the present review application as well as the Civil Application No. 3902/2005 amounts to abuse of process of law.

On the earlier occasion, prior to admission of this matter, the petitioner had filed Civil Application No.8357 of 2004 for the same reliefs which were sought in the C.A.No. 3902 of 2005. Vide order dated 1.3.2005, this Court observed that instead of allowing the petitioner to get copies of the documents as sought for, in the interest of justice, it wouls be appropriate to direct respondent no.1 to keep the relevant record ready for perusal at the time of admission of the petition. It was further made clear that if the counsel for the petitioner seeks to inspect the documents, by an order dated 16.3.2005, the petition was admitted.

Thereafter, when the Civil Application No.8357 of 2004 was listed before this Court, on 21.4.2005 the petitioner did not press the said C.A. It is difficult to understand as to how the petitioner could file C.A., for the same reliefs which were claimed in the earlier C.A. i.e. 8357 of 2004 and which was not pressed. We, are, therefore, of the considered view that the said Civil Application itself was misconceived in law.

Learned counsel for the petitioner has nor been in a position to point out any error apparent on the face of the record so as to warrant review of the order dated 7.4.2005. The review application is, therefore, rejected with costs which is quantified at Rs. 1000/-. Costs shall be paid by the petitioner to the High Court Legal Services Sub-Committee, Nagpur within a period of two weeks from today."

The copies of orders passed on civil applications are clubbed together and annexed herewith at ANNEXURE-R-3.

In the backdrop of above position, the second appeal of the appellant is liable to be dismissed.

4. वरील खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे. आणि सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. 26.8.2010 च्या पत्राने मुद्या क्र.1 ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. आणि मुद्या क्र.2 बाबतची वस्तुस्थिती कळविलेली दिसते. तथापी अपीलकर्त्याने त्या मुद्याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे मत व अभिप्राय मागितलेले दिसतात. तसेच माहितीच्या अधिकारान्वये कोणत्याही मुद्याबाबत मत किंवा

अभिप्राय किंवा मार्गदर्शन देणे अपेक्षित नाही. जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध आहे अशीच माहिती देणे अपेक्षित आहे. तसेच प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपीलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचे नमुद करुन प्रथम अपील फेटाळलेले आहे. त्याबाबतचा प्रथम अपीलाचा निर्णयही सविस्तर देण्यात आलेला आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1682-1690

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 91 नाग/2011**

सौ. योगिता संजय जांभुळकर उर्फ योगिता भिमराव कोचे
महात्मा फुले वार्ड तिरोडा
पो. ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, सिव्हील लाईन्स, नागपूर

2) श्री एस. एम. कांडलकर
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 4.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सौ. योगिता संजय जांभुळकर उर्फ योगिता भिमराव कोचे यांच्या जात पडताळणी दाखला संबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी विहित मुदतीत माहिती माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभागीय समाज कल्याण अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होवून निर्णय देण्यात आला. मात्र त्या नंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर श्री कांडलकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर यांच्या वतीने श्री पाडवार विधी अधिकारी हे उपस्थित होते. या दोन्ही अधिका–यांनी आजच्या सुनावणीस आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा दि. 4.8.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज हा त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नव्हता. सदरचा अर्ज प्रथमतः चंद्रपूर समितीकडे गेलेला होता. चंद्रपूर समितीकडून सदरचा अर्ज नागपूर समितीकडे दि. 6.9.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने जोडपत्र 'अ' मधील नियम 6 (1) अन्वये केलेला अर्ज हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी नागपूर यांचेकडे केलेला होता. सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेला नव्हता. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या अर्जाबाबत प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आणि त्या सुनावणी मध्ये दि. 15.10.2010 रोजी निर्णय निर्गमीत करुन असे नमुद केले की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर यांचेकडे विहित अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे नमुद करुन अपीलकर्त्यास कळविले आहे.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहिती अधिकारा खालील दि. 4.8.2010 चा अर्ज हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी यांचेकडे हस्तांतर करुन अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सुचना निर्गमीत करणे न्यायाचित होईल. म्हणून प्रस्तूत प्रकरणी खालीलप्रमणे आदेश निर्गमीत करण्यात येत असून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्त्याचा दि. 4.8.2010 चा माहितीचा अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 यांनी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर यांचेकडे त्वरीत हस्तांतर करावा आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्यावर नियमाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1688-1690

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 90 नाग/2011**

श्री चंद्रकांत नेमाशंकर हाडके
खामला जुनी वस्ती, सम्यक बुध्द विहाराच्या मागे,
खामला, नागपूर
ता. जि. नागपूर – 25 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. पी. पासेबंद
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(पश्चिम)
उत्तर अंबाझरी मार्ग नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री पी. डी. गांगुली
जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (पश्चिम)
उत्तर अंबाझरी मार्ग नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी (पश्चिम) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा खामला खसरा नंबर 9/1 ही जागा एनआयटी ने अजनी स्ट्रीट स्कीम अंतर्गत अधिग्रहीत केलेली आहे. क्षेत्र 5.63 एकर असून सदरच्या जागेवर हुडकोने वसाहत निर्माण केलेली आहे. या संपादीत केलेल्या जागेपैकी आता किती जागा खुली (ओपन) आहे याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना दि. 3.11.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती त्यांच्या कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. म्हणून त्यांचे याबाबत समाधान झाले नाही करीता त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता नागपूर सुधार

प्रन्यास यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 20.12.2010 ला पारीत करण्यात आला आणि त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांने मागितलेली माहिती 15 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी. तथापी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी तथा विभागीय अधिकारी (पश्चिम) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री पी.डी.गांगुली हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री एस.पी.पासेबंद हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा दि. 6.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 6.10.2010 प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या रेकॉडवरुन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2010 रोजी असे कळविले की आपण मागितलेली माहिती अभिलेखात उपलब्ध नाही. या निर्णयावर नाराज होवून अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात त्यांचेकडे दि. 20.11.2010 ला सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्यया वेळी अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आणि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विभागीय कार्यालय(पश्चिम) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचे कार्य क्षेत्रातील असल्यामुळे ती नागपूर सुधार प्रन्यासचे इतर विभागातून प्राप्त करुन पक्षकारास देण्यात यावी आणि सदरची माहिती 15 दिवसाचे आत विनामुल्य अपीलकर्त्यास देण्याचे त्यांनी निर्देश दिले. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.1.2010 च्या पत्राने हुडको कॉलनी दर्शविणा–या नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिली. सदरच्या नकाशाची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे आयोगापुढे त्यांनी मान्य केले. मात्र सदरच्या नकाशा वरुन नेमकी किती जमीन खुली (ओपन) आहे याबाबतचा कोणताही बोध होत नाही. तसेच सदरच्या नकाशातील तांत्रीक बाबी हया त्यांच्या लक्षात येत नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही नागपूर सुधार प्रन्यास नागपूर कार्यालयांचे कार्य क्षेत्रात आहे. त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देखील दिलेले आहेत. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयाला

अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन प्रस्तूत जमीनीपैकी किती जमीन खुली (ओपन) आहे याची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलातील निर्णयानुसार आवश्यक ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये आता किती जमीन खुली (ओपन) आहे त्याचा तपशिल द्यावा.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1692-1694

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 89 नाग/2011**

कु. ज्योती भिमराज जगनाडे
C/o. राजू मोहतुरे, प्लॉट नं.17,
दिवाण ले–आऊट, स्वामी नगर– 2
बेसा रोड, मानेवाडा, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ
प्रकाश भवन, लिंक रोड, सदर, नागपूर
2) श्री दि.ब.अंबादे
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ
प्रकाश भवन, लिंक रोड, सदर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.4.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. व्ही.व्ही.वडयाळकर हे हजर होते. त्यांनी अपीलकर्ता यांच्या वतीने बाजू मांडतांना त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दिनांक 28.6.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर शहर परिमंडळ अंतर्गत कनिष्ठ यंत्रचालक पदाच्या भरती प्रक्रियेतील महीला आरक्षणाबाबत माहिती मागितलेली असून त्यामध्ये एकूण पदाच्या 30 टक्के एवढे आरक्षण महीला करीता राखून ठेवलेले होते. परंतू सदर भरती प्रक्रियेच्या निवड सूचीमध्ये महीलांना 30 टक्के आरक्षणाचा लाभ देण्यात आलेला नाही याबाबतची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 29.6.2010 च्या पत्राने असे

कळविले की आपण मागितलेली माहिती व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग सामान्य प्रशासन विभाग) यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे संदर्भीय माहिती त्यांचेकडून मागविण्यात येत आहे. माहिती प्राप्त होताच ती देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र त्यानंतर व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर शहर परिमंडळ नागपूर यांनी दि. 27.7.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. तथापी कनिष्ठ यंत्रचालकच्या रीक्त जागा भरण्याची पूर्ण प्रक्रिया Institute of Banking Personal Selection या संस्थे मार्फत झालेली असल्यामुळे त्यांचेकडून माहिती मागवावी. यावर अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्य अभियंता यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री अंबादे व व्यवस्थापक श्री पुंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने देखील श्री अंबादे यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 28.6.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 28.6.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन सदरची माहिती ही व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) यांचेशी संबंधीत असल्यामुळे सदरचा अर्ज दि. 29.6.2010 च्या पत्राने त्यांचेकडे पाठविला आणि अपीलकर्त्यास असे कळविले की सदरची माहिती ही व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर माहिती देण्यात येईल याची जाणीव अपीलकर्त्यास करुन देण्यात आली.

5. सदरचा अर्ज व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. च्या रीक्त जागा भरण्याची पूर्ण प्रक्रिया Institute of Banking Personal Selection या संस्थे मार्फत महावितरणाने केलेली आहे म्हणून त्यांचेकडून ती माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्त्यास दि. 27.7.2010 च्या पत्राने कळविल्याचे त्यांनी नमुद केले. मात्र याबाबत व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की ज्या उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे त्या उमेदवाराची निवड सुची ही त्यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर आणि महावितरणाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

6. मात्र त्यानंतर प्रथम अपील मुख्य अभियंता यांचेकडे दाखल केले असे श्री अंबादे यांनी सुनावणीत नमुद केले आणि आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने दाखल केलेले अपील जोडपत्र 'ब' मधील विहित नमुन्यात नव्हते. त्याचप्रमाणे सदरचे प्रथम अपील दाखल करण्याची मुदत देखील संपलेली होती. हया

बाबी विचारात घेवून अपीलकर्त्याचे अपील प्रथम अपीलीय अधिका–यांनी फेटाळल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

7. अपीलकर्ता यांचे वकील तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. च्या रीक्त जागा भरण्याची पूर्ण प्रक्रिया Institute of Banking Personal Selection या संस्थे मार्फत घेण्यात आलेली आहे आणि आता निवड झालेल्या उमेदवाराची यादी उपलब्ध असून निवड केलेल्या उमेदवारामध्ये महीला देखील आहेत. निवड केलेल्या उमेदवाराची यादी वेबसाईटवर जरी प्रसिध्द केलेली असली तरी वेबसाईटवरुन सदरची माहिती सामान्य व्यक्तीला उपलब्ध होणे सहज शक्य होत नाही म्हणून व्यवस्थापक (कर्मचारी वर्ग) यांनी अपीलकर्त्यास कनिष्ठ यंत्रचालक पदासाठी निवड केलेल्या सर्व उमेदवाराची निवड यादी विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व न्यायोचीत होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कनिष्ठ यंत्रचालक पदासाठी अंतिम निवड केलेल्या उमेदवाराची निवड यादी विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1696-1698

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 106 नाग/2011, 107 नाग/2011, 108 नाग/2011, 109 नाग/2011, 110 नाग/2011,**

श्री भास्कर मिठूजी डोंगरे
कस्तूरबा वार्ड(कृष्णपूरा) गोंदिया (पंचशिल झेंडयाजवळ)
पो. ता. जि. गोंदिया – 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री ज्ञानेश्वर गोविंदराव चौधरी
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
मनोहरभाई पटेल हायस्कूल, चिचगाव–पुरगांव
पो. गणखैरा ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे पाचही द्वितीय अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी 1) दि. 13.4.2010, 2) दि. 28.4.2010, 3) दि. 8.4.2010, 4) दि. 30.4.2010, व 5) दि. 10.4.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली वेगवेगळे पाच माहितीचे अर्ज सादर करुन त्यामध्ये अर्जातील मुलींची यादी तसेच सावित्रीबाई शिष्यवृत्ती योजनेबाबतची माहिती तसेच इयत्ता 10 वी मध्ये शिकलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त भटक्या जमाती या विद्यार्थ्यांची माहिती तसेच माहितीच्या अधिकारा खाली शास्तीची वसूली इत्यादीची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मनोहरभाई पटेल हायस्कूल, चिचगाव–पुरगांव पो. गणखैरा ता. गोरेगाव जि. गोंदिया यांचेकडे माहिती मागितलेली होती. सदरचे पाचही माहितीच्या अधिकारा खालील अर्ज पोस्टाद्वारे यु.पी.सी.ने पाठविलेले होते. सदरचे अर्ज यु.पी.सी.ने

पाठविल्याचा पुरावा त्यांनी आयोगा समोर दाखविला. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. या पाचही प्रथम अपीलांची सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांनी घेतली आणि या पाचही प्रथम अपीलांत जन माहिती अधिकारी हे सुनावणीस हजर राहीले नाहीत. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पाचही प्रथम अपीलांचे निर्णय निर्गमीत केले आणि या पाचही प्रथम अपीलांच्या निर्णयात जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्यास त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती 10 दिवसात पुरविण्याचे आदेश दिले. मात्र त्या नंतरही त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे पाचही प्रकरणत पाच द्वितीय अपीले दाखल केल्याचे सुनावणीत आयोगासमोर नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मनोहरभाई पटेल हायस्कूल, चिचगाव–पुरगांव श्री ज्ञानेश्वर गोविंदराव चौधरी हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने वर नमुद केलेले पाचही माहितीच्या अधिकारा खालील अर्ज पोस्टाद्वारे त्यांचे कार्यालयाकडे आद्यापही प्राप्त झालेले नाही. त्याचप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडील प्रथम अपीलांच्या सुनावणीच्या नोटिसेस देखील त्यांना प्राप्त झालेले नाही. तसेच प्रथम अपीलांचे निर्णय देखील त्यांना अद्याप पर्यंत प्राप्त झालेले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांचेकडून माहिती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे आणखी असा खुलासा केला की त्यांचे हायस्कूल हे चिचगाव–पुरगांव येथे आहे. या ठिकाणी पोस्टा मार्फत पाठविलेला बराचसा पत्रव्यवहार त्यांना प्राप्त होत नाही. ज्याप्रमाणे त्यांना माहितीचे अर्ज प्राप्त झाले नाही त्याचप्रमाणे आयोगाच्या आजच्या सुनावणीचे पत्र देखील प्राप्त झालेले नाही. मात्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचे कार्यालयातून आयोगा पुढे आजच्या सुनावणीची माहिती त्यांना मिळाली म्हणून ते आयोगा पुढे आजच्या सुनावणीस हजर झाले. आणि त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या अर्जाच्या प्रती त्यांना आता उपलब्ध करुन दिल्यास 15 दिवसात अपीलकर्त्यास ते माहिती उपलब्ध करुन देतील. सदरच्या पाचही माहितीच्या अर्जाच्या प्रती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांना आयोगा समोर उपलब्ध करुन दिल्या. आणि त्यांना 15 दिवसात माहिती मिळण्याची त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले त्यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे पाठविलेले पाचही माहितीचे अर्ज त्यांनी यु.पी.सी.ने पाठविल्या नंतरही जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेले नाही. तसेच प्रथम अपीलांचे सुनावणीचे पत्रही त्यांना प्राप्त झालेले नाही. आणि प्रथम अपीलांचा निर्णय देखील त्यांना मिळालेला नाही. तसेच आजच्या सुनावणी बाबत

आयोगाचे पत्र देखील त्यांना प्राप्त झालेले नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी याबाबत पोस्टाद्वारे पाठविलेला पत्रव्यवहार त्यांना प्राप्त न झाल्याबाबत संबंधीत पोस्टाकडे तक्रार दाखल करुन भविष्यात त्यांना पोस्टाद्वारे पाठविलेले पत्र प्राप्त होतील याबाबतची काळजी जन माहिती अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे.

6. तथापी अपीलकर्त्याने आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांना पाचही माहितीच्या अर्जाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नमुद केलेल्या पाचही माहिती अधिकारा खालील माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1697-1699

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 118 नाग/2011**

श्री कामदास मोनी कोरडे
मु. तुळसी पो. विसोरा
ता. वडसा(देसाईगंज) जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय अर्जुनि/मोर.
ता. अर्जुनि/मोर. जि. गोंदिया
2) श्री एस. के. यादव
जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय अर्जुनि/मोर.
ता. अर्जुनि/मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.7.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय अर्जुनि/मोर. ता. अर्जुनि/मोर. जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा खांबपूरा प.ह.नं.45 आता नवीन नंबर 19 या अतिक्रमण जमीनीच्या पट्टा प्रकरणी वारसा हक्का प्रमाणे त्यांना 7/12 उताराची प्रत आणि नकाशाची प्रत याबाबतची माहिती मागितलेली होती. त्यांना संबंधीत तलाठी खांबपूरा यांचेकडून 7/12 च्या उताराची प्रत आणि नकाशाची प्रत मिळाली. मात्र अतिक्रमण झालेली जमीन ही त्यांच्या वडीलांच्या नावाने आहे. म्हणून ही अतिक्रमीत जमीन वारसा हक्काने वन हक्क कायद्यान्वये त्यांना मिळावी व त्यांचा पट्टा नावाने मिळावा अशी त्यांची मागणी आहे. म्हणून त्यांनी तहसिलदार अर्जुनि/मोर. यांचेकडे दि. 23.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र सदरचे प्रथम अपील तहसिलदार यांचेकडे दि. 3.4.2010 रोजी प्राप्त झाल्याचे दिसते प्रथम अपीलाचा निर्णय दि. 29.4.200 रोजी दिलेला असून प्रथम अपील

हे निकाली काढलेले आहे म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री एस. के. यादव हे संबंधीत तलाठी खांबपूरा यांचेसह आयोगा समोर उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 24.2.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त दि. 2.3.2010 रोजी झाला. त्या अर्जाला अनुसरुन सदरची माहिती ही तलाठी खांबपूरा साझा क्र. 19 यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडे दि. 4.3.2010 च्या पत्राने सदरचा अर्ज पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे तलाठी यांना कळविले आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास देवून अपीलकर्त्याने संबंधीत तलाठी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविले. त्याला अनुसरुन तलाठी खांबपूरा श्री सोनवाने यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या त्यांच्या वडीलांच्या अतिक्रमीत जमीनीचा 7/12 चा उतारा आणि नकाशा याच्या प्रती अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्या. सदरचा 7/12 चा उतारा आणि नकाशा त्यांना प्राप्त झाला असे अपीलकर्त्याने नमुद केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की त्यांच्या वडीलांच्या नावाने अतिक्रमीत असलेली जमीन वारसा हक्काने व वन हक्क कायद्यान्वये त्यांना मिळणे आवश्यक आहे आणि त्यासाठी अतिक्रमण जमीनीचा पट्टा त्यांना मिळणे आवश्यक आहे.

5. याबाबत नायब तहसिलदार श्री एस. के. यादव यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने तहसिलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते आणि प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत करण्यात आला. आणि त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 7/12 चा उतारा आणि नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिली असल्यामुळे प्रथम अपील हे निकाली काढलेले आहे. मात्र अपीलकर्त्याची मागणी अशी आहे की वन हक्क कायद्यान्वये त्यांना त्यांच्या वडीलांची अतिक्रमीत जमीनीचा पट्टा त्यांना देण्यात यावा असा आहे. तथापी यासाठी वन हक्क कायद्या प्रमाणे अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे वन हक्क कायद्यान्वये प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे. सदरची कार्यवाही ही वैधानीक स्वरुपाची असल्यामुळे त्या अपीलाचा निर्णय झाल्यानंतरच अतिक्रमीत जमीनीचा पट्टा अपीलकर्त्याच्या नावावर नियमाप्रमाणे करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल असे श्री यादव यांनी सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी श्री यादव यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास तलाठी यांनी आवश्यक असलेला 7/12 चा उतारा आणि नकाशा उपलब्ध करुन दिलेला आहे. मात्र वन हक्क जमीनीचा पट्टा मिळण्याबाबतची कार्यवाही ही वैधानीक स्वरुपाची असल्यामुळे अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे योग्य

होईल. तथापी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1698-1700

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 117 नाग/2011**

कु. संध्या हरिचंदजी डहारे
97/4, रघुजी नगर पोलीस क्वार्टर नागपूर
ता. जि. नागपूर –24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. एस. घाटे
प्रथम अपीलीय अधिकारी
अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय नागपूर
गिरीपेठ नागपूर

2) श्री एच. एन. गेडाम
जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी,
अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय नागपूर
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहे. मात्र उत्तरवादी हजर आहेत. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

2. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी, अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर कार्यालयातील श्री एच. एन. गेडाम हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा वरीष्ठ संशोधन अधिकारी श्री बी. एस. घाटे हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.5.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. सदरच्या अर्जात अपीलकर्ता यांनी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण सेवक या पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेमध्ये आणि मुलाखती मध्ये मिळालेल्या गुणाची माहिती आणि त्यांच्या लेखी परीक्षेच्या उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत मागितलेली होती. सदरची माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी माहितीचा अर्ज आस्थापना शाखेकडे दि. 7.5.2010 रोजी माहिती देण्यासाठी पाठविला. त्याला अनुसरुन सहा. माहिती अधिकारी यांनी दि. दि. 8.6.10 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये असे नमुद केले की आपण मागितलेल्या उत्तरपत्रिकेची प्रत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (1) (ड) नुसार व्यापक लोकहिताच्या दृष्टिकोनातून नसल्याने देता येत नाही. तसेच प्रकल्पग्रस्तासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागेसाठी दि. 27.10.09 च्या सुधारीत शासन निर्णयातील बदलाच्या तदतुदीनुसार मुलाखतीस बोलाविण्यात आले नव्हते असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील वरीष्ठ संशोधन अधिकारी यांचेकडे दि. 1.9.2010 रोजी दाखल केले. ते अपील दि. 4.9.2010 रोजी प्राप्त झाले. त्या अपीलावर दि. 4.10.2010 रोजी निर्णय देण्यात आला. आणि त्यामध्ये असे नमुद केले की उत्तरपत्रिका तपासणारा व ज्या माहिती अधिका–याच्या ताब्यात उत्तरपत्रिका आहेत त्यांच्यामध्ये विश्वासार्हतेचे नाते असल्यामुळे उत्तरपत्रिकेची प्रत देता येत नाही. मात्र अपीलकर्त्याचे लेखी गुण व तोंडी गुण यांची माहिती अपीलकर्त्यास देण्यात येत आहे असे नमुद केले आणि प्रकल्पग्रस्तासाठी राखीव पदाच्या बाबतीत शासन निर्णयाची दि. 27.10.2010 ची प्रत देखील अपीलकर्त्यास देण्यात येत आहे असे नमुद करुन प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

4. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सर्व उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेत मिळालेल्या गुणांची माहिती उपलब्ध करुन दिली तसेच प्रकल्पग्रस्तासाठी राखीव पदाच्या बाबतीत शासन निर्णयाची दि. 27.10.2010 ची प्रत देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र उत्तरपत्रिका ही गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येत नाही असा प्रथम अपीलात दिलेला निर्णय योग्य दिसून येतो. म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1702-1704

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 122 नाग/2011

श्री रमेश रामदास मेंडोले
55 योगेंद्र नगर, नेहरु कॉलनी जवळ नागपूर
ता. जि. नागपूर –13 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर श्री एस. एन. चौधरी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या वतीने श्री अवताळे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.10.2010 चा माहितीचा अर्ज दि. 2.11.2010 रोजी त्यांचेकडे प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन त्यांनी अपीलकर्त्यास दि. 30.11.2010 रोजी असे कळविले की आपण मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत येत नसल्यामुळे माहिती देता येत नाही.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने दि. 25.10.2010 च्या माहितीच्या अर्जात अशी माहिती मागितलेली आहे की त्यांनी स्वतःच्या जवळून रु. 995/– खर्च केलेले आहे. ते त्यांना त्वरीत मिळावे अशी अपीलकर्त्याची मागणी असल्यामुळे माहितीच्या अधिकारात ती माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास त्यांनी दि. 30.11.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री अवताळे यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. अपीलकर्त्याचे प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी

यांचेकडे प्राप्त झाले नाही. म्हणून त्याची सुनावणी घेवून निर्णय देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही असे देखील त्यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्त्याने त्यांच्या जवळून केलेला खर्च रक्कम रु. 995/— त्वरीत मिळण्यासाठीची कार्यवाही ही जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेशी संबंधीत आहे असे देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

6. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही गृह शाखेशी संबंधीत आहे म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्या शाखेकडून रु. 995/— अपीलकर्त्याने जवळून खर्च केल्या बाबतची शहानिशा करुन गृह शाखेने पेमेंट अदा करण्याबाबत काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी गृह शाखेकडून प्राप्त करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी खर्च केलेल्या रु. 995/— पेमेंट देण्याबाबत गृह शाखेने केलेल्या कार्यवाहीची माहिती किंवा त्याबाबतची वस्तुस्थिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1706-1707

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 126 नाग / 2011

श्री दिगंबर नत्थू रामटेके
रा. कुंभारे नगर पिंपरारोड, श्री राहुल देशभ्रतार यांच्या घरा समोर
तुमसर पो. ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती एस. बी. नरवाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर, छावणी, औरंगाबाद 431002
2) श्री एम. एस. पाटील
जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर, छावणी, औरंगाबाद 431002 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.10.2009 पासून मंजूर केलेल्या आगावू वेतनवाढी बाबत माहिती मागितलेली होती. त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक श्री एम. एस. पाटील हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता श्रीमती एस. बी. नरवाडे हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 13.8.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि त्या माहितीचे शुल्क रु. 75/— भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 30.8.2010 रोजी पत्र पाठविले. त्यानंतर अपीलकर्त्याने पाठविलेले माहितीचे शुल्क रु. 75/— दि. 6.10.2010 रोजी मनीऑर्डर द्वारे प्राप्त झाले. त्यानंतर दि. 16.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास स्पीड पोस्टद्वारे माहिती पाठविण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तथापी अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.10.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती त्यांना दि. 30.11.2010 रोजी पोस्टाने प्राप्त झाला त्यासाठी त्यांनी दि. 30.11.2010 च्या पोस्टाच्या पाकीटाचा पुरावा आयोगा समोर दाखविला. जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविलेली माहिती ही दि. 16.10.2010 रोजी पाठविली याबाबत पोस्टाचा दि. 16.10.2010 चा कोणताही पुरावा सादर केला नाही. मात्र सदरची माहिती दि. 30.11.2010 रोजी पोस्टाने प्राप्त झाल्याचे पोस्टाच्या पाकीटावरुन दिसून येते. म्हणून सदरची माहिती विलंबाने पाठविलेली असल्यामुळे माहितीचे शुल्क रु. 75/— परत करण्याची मागणी अपीलकर्त्याने आयोगा समोर केली.

5. आयोगा समोर प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 16.12.2010 रोजी ठेवण्यात आली होती. परंतू अपीलकर्ता सुनावणीस हजर राहिले नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले असे श्रीमती नरवाडे यांनी आयोगा समोर सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर माहिती विलंबाने पाठविलेली आहे. म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क परत करण्याची विनंती आयोगा समोर केली आणि त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास विलंबाने माहिती पाठविल्यामुळे माहितीचे शुल्क रु. 75/— परत करणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून त्वरीत माहितीचे शुल्क रु. 75/– जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास परत करुन त्याची पोच घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1709-1711

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 132 नाग/2011**

श्री विकास गणपतराव शेंडे
नगरी बॅंक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे,
हिंदनगर वर्धा
ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स, अनेक्स बिल्डींग सिताबर्डी नागपूर

2) श्री ठाकुर
जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर
धनवटे चेंबर्स, अनेक्स बिल्डींग सिताबर्डी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पल्लवी गृह निर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूर र. जि. नं. 413 मुळीक कॉम्प्लेक्स ब्लॉक नं. 3 वर्धा रोड नागपूर–25 या गृह निर्माण सहकारी संस्थे विषयी त्यांनी दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीच्या बाबत 1 ते 9 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 29.11.10 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती अपुर्ण व अर्धवट असल्यामुळे

प्रथम अपील विभागीय सहनिबंधक यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणीघेण्यात आली. आणि त्याचा निर्णय दि. 1.11.2010 रोजी देण्यात आला. आणि त्या निर्णयामध्ये त्यांचे प्रथम अपील फेटाळले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. तसेच अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगापुढे असेही सांगितले की सदरच्या गृह निर्माण सहकारी संस्थेवर निबंधक यांचे नियंत्रण असल्यामुळे सदरच्या संस्थेच्या संदर्भातील माहिती त्यांना निबंधक यांचेकडून मिळणे आवश्यक आहे.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक श्री ठाकुर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक यांच्या वतीने देखील श्री ठाकुर यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी श्री ठाकुर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 28.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या गृह निर्माण सहकारी संस्थेची माहिती ही उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–1 यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यानं त्यांचेकडे अर्ज कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे. तसेच उपनिबंधकानी अपीलकर्त्याच्या निवेदनाच्या प्रतीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 29.11.2010 च्या पत्राने 1 ते 9 मुद्यांच्या माहिती बाबतची वस्तुस्थिती कळविलेली आहे. दि. 29.11.2010 चे पत्र अपीलकर्त्यास दि. 9.12.2010 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. मात्र त्यामध्ये माहिती उपलब्ध नाही असे उत्तर दिलेले आहे. त्यामुळे संबंधीत निबंधकाकडून जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन त्यांना उपलब्ध करुन द्यावी असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

6. तसेच अपीलकर्ता यांनी विभागीय सहनिबंधक यांचकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्याचा निर्णय देण्यात आला. आणि त्या निर्णयामध्ये त्यांचे प्रथम अपील फेटाळले असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की पल्लवी गृह निर्माण सहकारी संस्था ही सहकारी कायद्यान्वये नोंदणी झालेली सहकारी संस्था असल्यामुळे त्या संस्थेवर वैधानीक नियंत्रण

हे निबंधकाचे आहे. म्हणून जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–1 यांचेकडून त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक यांनी प्रस्तूत संस्थे बाबतची माहिती उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर–1 यांचेकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1710-1712

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 133 नाग/2011**

श्री शेख सलीम शेख अकबर
इस्माईलपुरा, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नैताम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री बारहाते
जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महानगरपालीका, नगर पालीका आणि ग्रामपंचायत क्षेत्रामधील खाजगी शाळांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या बाबतीत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 13.9.2010 च्या पत्राद्वारे माहिती प्राप्त झाली. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीला ते उपस्थित राहूनही सुनावणी झाली नाही मात्र त्यानंतर दि. 6.1.2011 च्या पत्राने त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि

त्या निर्णया मध्ये जन माहिती अधिकारी राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा कामठी यांना अपीलकर्त्यास एक आठवडयाचे आत माहिती देण्याचा निर्णय दिला. तथापी इतर खाजगी शाळाबाबतची त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री बाराहाते हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री नैताम हे उपस्थित होते.

4. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 9.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्यास दि. 13.9.2010 च्या पत्राने त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ठेण्यात आली होती. त्या सुनावणीच्या दिवशी शासकीय कामकाजा निमित्त प्रथम अपीलीय अधिकारी यांना सभांना हजर राहणे आवश्यक असल्यामुळे सुनावणी होवू शकली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 6.1.2011 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा कामठी यांना अपीलकर्त्याने मागितलेली माहिती देण्याबाबत निर्णय दिला. तसेच आयोगापुढे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने एकूण 6 शाळां विषयी माहिती मागितलेली आहे. त्यापैकी 4 शाळा हया कायम विनाअनुदान तत्वावर आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम कायदा लागू होत नाही. तथापी सरस्वती शिशू व उच्च प्राथमिक शाळा कामठी आणि राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा कामठी हया 2 शाळा अनुदानीत असल्यामुळे त्याची माहिती अपीलकर्त्यास देण्याबाबत कळविले आहे.

5. याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ज्या शाळांना शासनाने विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे त्या शाळांची शासनाने दिलेल्या मान्यतेची प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच शाळांना मान्यता देण्याबाबतच्या शासन निर्णयाची कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास पाहिजे आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले म्हणून ही माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी अपीलकर्ता यांना खालील मुद्याची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

1) अपीलकर्त्याच्या दि. 9.8.2010 च्या माहिती अर्जात नमुद केलेल्या शाळापैकी ज्या शाळा विनाअनुदान तत्वावर शासनाने मंजूर केलेल्या आहे त्या मंजूरीची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

2) नवीन शाळा मंजूरीसाठी शासनाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1714-1716

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 136 नाग/2011**

श्री विनोद हरीहरजी मेश्राम
प्लॉट नं. 38, शिर्डीनगर, अयोध्यानगर साई मंदीरमागे,
लेन नं.4, नागपूर व
ता. जि. नागपूर – 440 024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, पाचवा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री एस. एन. कांडलकर
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, पाचवा माळा,
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 27.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर श्री एस. एन. कांडलकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर यांच्या वतीने श्री श्रीकांत पाडवार विधी अधिकारी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री कांडलकर यांनी आयोगा पुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 31.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे त्याच दिवशी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता यांनी 1 मार्च 2006 ते 31 जुलै 2010 या

कालावधीत एकूण प्राप्त लोहारवर्गीय गाडीलोहार, घिसाडी लोहार, घिसाडी, चितोडी लोहार, राजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, खातवाढी व जिनगर जातीच्या राज्यशासन, निमशासकीय, शासन अंगीकृत संस्थांचे (महामंडळे वगैरे) सेवेत कार्यरत अधिकारी/कर्मचारी व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी/सामान्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थांच्या एकूण प्राप्त झालेल्या, त्यातुन निकाली काढलेल्या व उर्वरीत प्रलंबित असलेल्या प्रलंबनाचे कारणासह अर्जदारांच्या जातनिहाय, नावासह पंजियन क्रमांक व दिनांक दर्शविणारी माहिती स्वतंत्रपणे देण्याची मागणी केली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहितीचे स्वरुप व व्याप्ती फार मोठया प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 7.8.2010 च्या पत्राने असे कळविले की जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीमध्ये स्वतंत्ररित्या जातीनिहाय प्रकरणांची तपासणी केली जात नाही. कालानुक्रमाने प्राप्त अर्जाची तपासणी केली जाते. त्यामुळे सदर माहिती आपण कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रत्यक्ष कार्यालयात येवून नियमानुसार शुल्क भरुन उपलब्ध अभिलेखाचे निरीक्षण करु शकता. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण मागितलेल्या नमुन्यात माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. तसेच अभिलेखाच्या पाहणी नंतर मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असली तरी त्यासंबंधीची लेखी संमती घेतल्याशिवाय माहिती देता येणार नाही असे अपीलकर्त्यास कळविण्यात आलेले आहे. सदरचे दि. 7.8.2010 चे पत्र यु.पी.एस.सी.द्वारे अपीलकर्त्यास पाठविण्यात आल्याबाबत त्यांनी आयोगापुढे पुरावा दाखल केला. या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने विधी अधिकारी श्रीकांत पाडवार हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दि. 16.9.2010 रोजी प्राप्त झाले होते. त्याची सुनावणी दि. 12.10.2010 रोजी घेण्यात आली. मात्र अपीलकर्ता सुनावणीस हजर राहिले नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12. 10.2010 रोजी देण्यात आला. आणि त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.8.10 च्या पत्रान्वये अपीलार्थीस नियमानुसार शुल्क भरुन अभिलेखाचे निरीक्षण करण्याबाबत कळविले आहे. परंतू अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात अभिलेखाचे निरीक्षणाकरीता उपस्थित झालेले नाही म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

6. जन माहिती अधिकारी श्री कांडलकर आणि विधी अधिकारी श्री पाडवार यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपात आहे. सदरची माहिती अपीलकर्त्याने मागितलेल्या नमुन्यात तयार करावयाची झाल्यास त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण साधनसामग्री त्या कामासाठी वापरावी लागेल आणि त्याचा विपरीत परिणाम त्यांच्याकडे दाखल झालेले 11000 प्रकरणांवर होईल त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7(9)

प्रमाणे माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे अपीलकर्त्यास ती माहिति उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. तथापी अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात अभिलेखाचे निरीक्षणाकरीता उपस्थित झाल्यास व त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिति उपलब्ध आहे त्या माहितीचे शुल्क भरल्यास माहिति उपलब्ध करुन देता येणे शक्य होईल.

7. जन माहिति अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती ही मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्यांच्या कार्यालयातील संपूर्ण साधनसामग्री त्या कामासाठी वापरावी लागेल आणि त्याचा विपरीत परिणाम जनसामान्यांच्या महत्वाच्या कामावर होईल. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.8.10 च्या माहिती संदर्भात दिलेले उत्तर योग्य दिसून येत असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिति आयुक्त,**
**राज्य माहिति आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1718-1720

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिति आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिति आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 137 नाग/2011**

श्री विनोद हरीहरजी मेश्राम
प्लॉट नं. 38, शिर्डीनगर, अयोध्यानगर साई मंदीरमागे,
लेन नं.4, नागपूर व
ता. जि. नागपूर – 440 024 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, पाचवा माळा, सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री एस. एन. कांडलकर
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर
नविन प्रशासकीय इमारत क्र.2, पाचवा माळा,
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 27.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर श्री आर. डी. आत्राम हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर श्री जी. पी. मोहबंशी यांच्या वतीने श्री दाभाडे विधी अधिकारी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 31.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे त्याच दिवशी प्राप्त झाला. अपीलकर्ता यांनी 1 मार्च 2006 ते 31 जुलै 2010 या कालावधीत एकूण

प्राप्त लोहारवर्गीय गाडीलोहार, घिसाडी लोहार, घिसाडी, चितोडी लोहार, राजपूत लोहार, पांचाळ लोहार, खाती, खातवाढी व जिनगर जातीच्या राज्यशासन, निमशासकीय, शासन अंगीकृत संस्थांचे (महामंडळे वगैरे) सेवेत कार्यरत अधिकारी/कर्मचारी व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी/सामान्य अभ्यासक्रमाचे विद्यार्थांच्या एकूण प्राप्त झालेल्या, त्यातुन निकाली काढलेल्या व उर्वरीत प्रलंबित असलेल्या प्रलंबनाचे कारणासह अर्जदारांच्या जातनिहाय, नावासह पंजियन क्रमांक व दिनांक दर्शविणारी माहिती स्वतंत्रपणे देण्याची मागणी केली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहितीचे स्वरुप व व्याप्ती फार मोठया प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 7.8.2010 च्या पत्राने असे कळविले की जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीमध्ये स्वतंत्ररित्या जातीनिहाय प्रकरणांची तपासणी केली जात नाही. कालानुक्रमाने प्राप्त अर्जाची तपासणी केली जाते. त्यामुळे सदर माहिती आपण कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रत्यक्ष कार्यालयात येवून नियमानुसार शुल्क भरुन उपलब्ध अभिलेखाचे निरीक्षण करु शकता. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये आपण मागितलेल्या नमुन्यात माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. तसेच अभिलेखाच्या पाहणी नंतर मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असली तरी त्यासंबंधीची लेखी संमती घेतल्याशिवाय माहिती देता येणार नाही असे अपीलकर्त्यास कळविण्यात आलेले आहे. सदरचे दि. 7.8.2010 चे पत्र यु.पी.एस.सी. द्वारे अपीलकर्त्यास पाठविण्यात आल्याबाबत त्यांनी आयोगापुढे पुरावा दाखल केला. या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले विधी अधिकारी श्री दाभाडे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दि. 16.9.2010 रोजी प्राप्त झाले होते. त्याची सुनावणी दि. 12.10.2010 रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता सुनावणीस हजर होते. अपीलकर्त्याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12.10.2010 रोजी देण्यात आला. आणि त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती आणि जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अवलोकन केले असता अपीलकर्त्याने त्याच्या मर्जीनुसार ज्या स्वरुपात माहिती मागितली आहे त्यानुसार माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. सर्व जातीच्या नोंदी असलेल्या दि. 1.4.2006 ते 31.7. 2010 या कालावधीतील नोंदी रजिस्टरच्या स्वरुपात आहे. त्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती नियमाप्रमाणे झेरॉक्स प्रतीचे शुल्क भरुन त्यांना माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिला. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात माहितीच्या शुल्काचे पैसे भरण्यास हजर झाले नाहीत म्हणून त्यांना माहिती देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत सांगितले.

6. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती ही मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्यांच्या कार्यालयातील संपूर्ण साधनसामग्री त्या कामासाठी वापरावी लागेल आणि त्याचा विपरीत परिणाम जनसामान्यांच्या महत्वाच्या कामावर होईल. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.8.10 च्या माहिती संदर्भात दिलेले उत्तर योग्य दिसून येत असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1719-1721

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**